## सृजन

# नाट्य विशेषांक





महानिर्मिती

महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

## आंतर विद्युत केंद्र

# नाट्य स्पर्धा

## २०२३ - २०२४

**तरुण भारत**
Apla Nagpur | 2024-07-01 | Page- 3
epaper.tarunbharat.net

# उद्यापासून महानिर्मितीची नाट्य स्पर्धा

◆ **नागपूर, ३० जून**

महानिर्मितीतर्फे दरवर्षी आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कोराडी औष्णिक वीज केंद्राकडे यजमानपद असून, २ ते ६ जुलैदरम्यान सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे ही स्पर्धा होणार असून, सकाळ व सायंकाळ अशा दोन सत्रांत रोज दोन नाट्यप्रयोग होणार आहेत.

२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन सोहळा, तर ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पारितोषिक वितरण समारंभ मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. महानिर्मितीच्या राज्यभरातील औष्णिक, जल, वायू, विद्युत केंद्रांचे एकूण १० नाट्य संघ सहभागी होणार आहेत. महानिर्मितीमध्ये कलावंतांची खाण असून, कसदार अभिनय, संवादफेक, संगीत, प्रकाश योजना, नेपथ्य आणि दिग्दर्शनाची उत्तम जाण, अनुभव असलेल्या गुणी कलावंतांमुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची होणार आहे. ज्येष्ठ रंगकर्मी संजय हल्दीकर (कोल्हापूर), बाळकृष्ण तिडके (नाशिक) आणि संगीता टिपले (नागपूर) यांच्याकडे सदर नाट्य स्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी देण्यात आली आहे. नाट्य रसिकांनी, नाट्य क्षेत्राशी निगडित व्यक्ती, पदाधिकारी व इच्छुकांनी या नि:शुल्क दर्जेदार नाट्य कृतींचा भरपूर आस्वाद घ्यावा, असे आवाहन नाट्य स्पर्धा आयोजन समितीचे अध्यक्ष व कोराडी वीज केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे यांनी केले आहे.

**नाटकांची नावे आणि वेळ**

२ जुलै रोजी सकाळी ११.३० वाजता गावभाग कोराडी वीज केंद्र, सायंकाळी ६.३० वाजता भांडा सौख्य भरे उरण वायू विद्युत केंद्र; ३ जुलै रोजी सकाळी १० वाजता कार्टी नं. १ कोयना जल विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता एक्सपायरी डेट भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र; ४ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता २ स्पेशल नाशिक विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता यक्षप्रश्न चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र; ५ जुलै रोजी सकाळी १०.३० वाजता अनपेक्षित पारस विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता संशायात्मा विनश्यती परळी वीज केंद्र; ६ जुलै रोजी सकाळी १० वाजता तिचे संदर्भ नसलेली गोष्ट सांघिक कार्यालय मुंबई, दुपारी ४ वाजता पूर्णविराम खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र. (तभा वृत्तसेवा)

# महानिर्मिती की नाट्यस्पर्धा कल से

**नागपुर ।** महानिर्मिती की ओर से कोराडी औष्णिक बिजली अंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा का आयोजन 2 से 6 जुलाई के दरमियान सायंटीफिक सभागृह, लक्ष्मीनगर, में किया जा रहा है. सुबह और शाम दो सत्रों में रोज दो नाटकों के प्रयोग होंगे. 2 जुलाई को सुबह 9 बजे उदघाटन समारोह होगा. 6 जुलाई की शाम 6 बजे पुरस्कार वितरण मान्यवरों की उपस्थिति में होगा.

इस मौके पर महानिर्मिती के राज्यभर से औष्णिक, जल, वायू विद्युत केंद्र के कुल दस नाट्य संघ कार्यक्रम में शामिल होंगे. जिसमें प्रमुखता से 2 जुलाई को अपरान्ह साढ़े 11 बजे गांवभाग कोराडी बिजली केंद्र, शाम साढ़े 6 बजे भांडा सौख्य भरे, उरण वायू विद्युत केंद्र. 3 जुलाई को सुबह दस बजे कार्टी नं.1 कोयना जल विद्युत केंद्र, शाम 6 बजे एक्सपायरी डेट भुसावल औष्णिक विद्युत केंद्र. 4 जुलाई को सुबह साढ़े दस बजे 2 स्पेशल नाशिक विद्युत केंद्र, शाम 6 बजे यक्षप्रश्न चंद्रपुर महाऔष्णिक विद्युत केंद्र. 5 जुलाई को सुबह साढ़े दस बजे अनपेक्षित पारस विद्युत केंद्र, शाम 6 बजे संशायात्मा विनश्यंती परली बिजली केंद्र, 6 जुलाई को सुबह दस बजे तिचे संदर्भ नसलेली गोष्ट सांघिक कार्यालय मुंबई, दोपहर 4 बजे पूर्णविराम खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र इस नाट्यकृति का समावेश है.

**विदर्भ की बात**
नागपुर, 30 जून 2024 | 2

# शहर में महानिर्मिती की नाट्य प्रतियोगिता 2 जुलाई से

**राज्यभर की 10 टीमें करेंगी प्रतिभा का प्रदर्शन**

**नागपुर।** बिजली उत्पादन की प्रक्रिया में लगातार काम कर रहे मेनपावर में विद्यमान सुप्त कला-गुणों को विस्तार देने के लिए महानिर्मिती द्वारा हर साल अंतर विद्युत केंद्र नाटक प्रतियोगिता का आयोजन किया जाता है। इस वर्ष, कोराडी थर्मल पावर स्टेशन इस प्रतियोगिता की मेजबानी कर रहा है। यह प्रतियोगिता 2 से 6 जुलाई तक साइंटिफिक हॉल, लक्ष्मीनगर, नागपुर में आयोजित की जाएगी। उद्घाटन समारोह 2 जुलाई को सुबह 9 बजे और पुरस्कार समारोह 6 जुलाई को शाम 6 बजे गणमान्य व्यक्तियों की उपस्थिति में आयोजित किया जाएगा। महानिर्मिती की इस नाट्य प्रतियोगिता में राज्य भर के थर्मल, जल और गैस बिजली स्टेशनों की कुल 10 नाट्य टीमें भाग लेंगी। मुख्य रूप से 2 जुलाई को सुबह 11.30 बजे 'गावभाग' कोराडी पावर स्टेशन तथा शाम 6.30 बजे 'भांडा सौख्य भरे' उरण वायु पावर स्टेशन की ओर से प्रस्तुति दी जायेगी। 3 जुलाई सुबह 10 बजे 'कार्टी नं. 1' कोयना जल विद्युत केंद्र, शाम 6 बजे 'एक्सपायरी डेट' भुसावल थर्मल पावर सेंटर की प्रस्तुति होगी। 4 जुलाई सुबह 10.30 बजे '2 स्पेशल' नासिक पावर स्टेशन तथा शाम 6 बजे 'यक्षप्रश्न' चंद्रपुर महाऔष्णिक पावर स्टेशन की प्रस्तुति होगी। 5 जुलाई सुबह 10.30 बजे 'अनपेक्षित' पारस पावर स्टेशन तथा शाम 6 बजे 'संशयात्मा विनश्यति' यह परली पावर स्टेशन की प्रस्तुति होगी। 6 जुलाई सुबह 10 बजे 'तिचे संदर्भ नसलेली गोष्ट' सांघिक कार्यालय मुंबई तथा शाम 4 बजे 'पूर्णविराम' यह खापरखेड़ा औष्णिक विद्युत केंद्र की नाट्यकृति की प्रस्तुति होगी। महानिर्मिती में कलाकारों की खदान है। अतः अभिनय, संवाद, संगीत, प्रकाश, डिजाइन, दृश्यावली और निर्देशन में अच्छा ज्ञान और अनुभव रखने वाले प्रतिभाशाली कलाकारों के कारण प्रतिस्पर्धा बहुत कांटेदार होने वाली है। वरिष्ठ रंगकर्मी संजय हल्दीकर (कोल्हापुर), बालकृष्ण तिडके (नासिक) एवं श्रीमती संगीता टिपले (नागपुर) को उक्त नाट्य प्रतियोगिता के निर्णायक की जिम्मेदारी दी गई है। नाट्य प्रतियोगिता आयोजन समिति के अध्यक्ष और मुख्य अभियंता कोराडी पावर स्टेशन विलास मोटघरे ने अपील की है कि नाट्य प्रेमी, नाट्य क्षेत्र से जुड़े लोग, पदाधिकारी और उत्सुक नागरिक इस गुणवत्तापूर्ण और निःशुल्क प्रतियोगिता का आनंद लें।

# महानिर्मितीतर्फे आजपासून नाट्यस्पर्धेचे आयोजन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत अविरत कार्यरत असलेल्या मनुष्यबळाच्या सुप्तगुणांना वाव देण्यासाठी महानिर्मितीतर्फे २ ते ६ जुलै दरम्यान आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कोराडी औष्णिक वीज केंद्राकडे यजमान पद देण्यात आले आहे.

सायंटीफिक सभागृहात आयोजित करण्यात आलेली स्पर्धेत सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रांमध्ये रोज दोन नाट्यप्रयोग होणार आहेत. २ जुलै रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन सोहळा तर ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पारितोषिक समारंभ, मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे. महानिर्मितीचे राज्यभरातील औष्णिक, जल, वायू विद्युत केंद्रांचे एकूण १० नाट्यसंघ सहभागी होणार आहेत. २ जुलै ला सकाळी ११.३० वाजता 'गावभाग' (कोराडी वीज केंद्र), सायंकाळी ६.३० वाजता 'भांडा सौख्य भरे' (उरण वायू विद्युत केंद्र) ३ जुलैला सकाळी १० वाजता 'कार्टी नं.१' (कोयना जल विद्युत केंद्र), सायंकाळी ६ वाजता 'एक्सपायरी डेट' (भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र) ४ जुलैला सकाळी १०.३० वाजता '२ स्पेशल' (नाशिक विद्युत केंद्र) सायंकाळी ६ वाजता 'यक्षप्रश्न' (चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र) ५ जुलैला सकाळी १०.३० वाजता 'अनपेक्षित' (पारस विद्युत केंद्र), सायंकाळी ६ वाजता 'संशायात्मा विनश्यती' (परळी वीज केंद्र) ६ जुलैला सकाळी १० वाजता 'तिचे संदर्भ नसलेली गोष्ट' (सांघिक कार्यालय मुंबई), दुपारी ४ वाजता 'पूर्णविराम' (खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र) या नाट्यकृतींचा समावेश आहे. या नाट्यमहोत्सवाचे ज्येष्ठ रंगकर्मी संजय हल्दीकर (कोल्हापूर), बाळकृष्ण तिडके (नाशिक) आणि संगीता टिपले (नागपूर) परीक्षण करणार आहे. रसिकांना प्रवेश निःशुल्क आहे. या दर्जेदार नाट्यकृतींचा भरपूर आस्वाद घ्यावा, असे नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे अध्यक्ष व मुख्य अभियंता कोराडी वीज केंद्र विलास मोटघरे यांनी आवाहन केले आहे.

# २ जुलै पासून नागपुरात महानिर्मितीची नाट्यस्पर्धा

## नाट्य रसिकांसाठी पर्वणी

■ **महासागर प्रतिनिधी,**

नागपूर, दि. २९ : वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत अविरत कार्यरत असलेल्या मनुष्यबळाच्या सुप्तगुणांना वाव देण्याकरिता दरवर्षी महानिर्मितीतर्फे आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कोराडी औष्णिक वीज केंद्राकडे यजमान पद असून २ ते ६ जुलै दरम्यान सायंटीफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे ही स्पर्धा होणार असून सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रांमध्ये रोज दोन नाट्यप्रयोग होणार आहेत.

२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन सोहळा तर ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पारितोषिक समारंभ, मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

महानिर्मितीचे राज्यभरातील औष्णिक, जल, वायू विद्युत केंद्रांचे एकूण १० नाट्यसंघ सहभागी होणार आहेत. त्यात प्रामुख्याने २ जुलै ला सकाळी ११.३० वाजता गावभाग कोराडी वीज केंद्र, सायंकाळी ६.३० वाजता भांडा सौख्य भरे उरण वायू विद्युत केंद्र.

३ जुलै ला सकाळी १० वाजता कार्टी नं.१ कोयना जल विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता एक्सपायरी डेट भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र.

४ जुलै ला सकाळी १०.३० वाजता २ स्पेशल नाशिक विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता यक्षप्रश्न चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र.

५ जुलै ला सकाळी १०.३० वाजता अनपेक्षित पारस विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता संशायात्मा विनश्यती परळी वीज केंद्र

६ जुलै ला सकाळी १० वाजता तिचे संदर्भ नसलेली गोष्ट सांघिक कार्यालय मुंबई, दुपारी ४ वाजता पूर्णविराम खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र या नाट्यकृतींचा समावेश आहे.

**माध्यमांच्या नजरेतून**

दैनिक **जनप्रभात**
सामाजिक परिवर्तनाचा बुलंद आवाज
Page 2
30 Jun 2024

# २ जुलै पासून नागपुरात महानिर्मितीची नाट्यस्पर्धा; नाट्य रसिकांसाठी पर्वणी

**नागपूर** ■ दिलीप येवले




वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत अविरत कार्यरत असलेल्या मनुष्यबळाच्या सुप्तगुणांना वाव देण्याकरिता दरवर्षी महानिर्मितीतर्फे आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कोराडी औष्णिक वीज केंद्राकडे यजमान पद असून २ ते ६ जुलै दरम्यान सायंटीफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे ही स्पर्धा होणार असून सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रांमध्ये रोज दोन नाट्यप्रयोग होणार आहेत.

२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन सोहळा तर ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पारितोषिक समारंभ, मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.महानिर्मितीचे राज्यभरातील औष्णिक, जल, वायू विद्युत केंद्रांचे एकूण १० नाट्यसंघ सहभागी होणार आहेत.त्यात प्रामुख्याने २ जुलै ला सकाळी ११.३० वाजता 'गावभाग' कोराडी वीज केंद्र, सायंकाळी ६.३० वाजता 'भांडा सौख्य भरे' उरण वायू विद्युत केंद्र. ३ जुलै ला सकाळी १० वाजता 'कार्टी नं.१' कोयना जल विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता 'एक्सपायरी डेट' भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र.४ जुलै ला सकाळी १०.३० वाजता '२ स्पेशल' नाशिक विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता 'यक्षप्रश्न' चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र.५ जुलै ला सकाळी १०.३० वाजता 'अनपेक्षित' पारस विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता 'संशायात्मा विनश्यती' परळी वीज केंद्र ६ जुलै ला सकाळी १० वाजता 'तिचे संदर्भ नसलेली गोष्ट' सांघिक कार्यालय मुंबई, दुपारी ४ वाजता 'पूर्णविराम' खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र या नाट्यकृतींचा समावेश आहे.

महानिर्मितीमध्ये कलावंतांची खाण असून कसदार अभिनय, संवाद फेक, संगीत,प्रकाश योजना, नेपथ्य आणि दिग्दर्शनाची उत्तम जाण, अनुभव असलेल्या गुणी कलावंतांमुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची होणार आहे. ज्येष्ठ रंगकर्मी संजय हल्दीकर (कोल्हापूर), बाळकृष्ण तिडके (नाशिक) आणि सौ. संगीता टिपले (नागपूर) यांचेकडे सदर नाट्यस्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी देण्यात आली आहे.तरी, नागपुरातील नाट्य रसिकांनी, नाट्य क्षेत्राशी निगडित व्यक्ती,पदाधिकारी तथा इच्छुकांनी या निःशुल्क दर्जेदार नाट्यकृतींचा भरपूर आस्वाद घ्यावा असे नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे अध्यक्ष तथा मुख्य अभियंता कोराडी वीज केंद्र विलास मोटघरे यांनी आवाहन केले आहे.

# २ जुलै पासून नागपुरात महानिर्मितीची नाट्यस्पर्धा




## नाट्य रसिकांसाठी पर्वणी

**भंडारा पत्रिका / प्रतिनिधी**

**नागपूर :** वीज उत्पादनाच्या प्रक्रियेत अविरत कार्यरत असलेल्या मनुष्यबळाच्या सुप्तगुणांना वाव देण्याकरिता दरवर्षी महानिर्मितीतर्फे आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यावर्षी कोराडी औष्णिक वीज केंद्राकडे यजमान पद असून २ ते ६ जुलै दरम्यान सायंटीफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे ही स्पर्धा होणार असून सकाळी व सायंकाळी अशा दोन सत्रांमध्ये रोज दोन नाट्यप्रयोग होणार आहेत.

२ जुलै रोजी सकाळी ९ वाजता उद्घाटन सोहळा तर ६ जुलै रोजी सायंकाळी ६ वाजता पारितोषिक समारंभ, मान्यवरांच्या उपस्थितीत होणार आहे.

महानिर्मितीचे राज्यभरातील औष्णिक, जल, वायू विद्युत केंद्रांचे एकूण १० नाट्यसंघ सहभागी होणार आहेत.

त्यात प्रामुख्याने २ जुलै ला सकाळी ११.३० वाजता 'गावभाग' कोराडी वीज केंद्र, सायंकाळी ६.३० वाजता 'भांडा सौख्य भरे' उरण वायू विद्युत केंद्र.

३ जुलै ला सकाळी १० वाजता 'कार्टी नं.१' कोयना जल विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता 'एक्सपायरी डेट' भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र.

४ जुलै ला सकाळी १०.३० वाजता '२ स्पेशल' नाशिक विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता 'यक्षप्रश्न' चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र.

५ जुलै ला सकाळी १०.३० वाजता 'अनपेक्षित' पारस विद्युत केंद्र, सायंकाळी ६ वाजता 'संशयात्मा विनश्यती' परळी वीज केंद्र.

६ जुलै ला सकाळी १० वाजता 'तिचे संदर्भ नसलेली गोष्ट' सांघिक कार्यालय मुंबई, दुपारी ४ वाजता 'पूर्णविराम' खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र या नाट्यकृतींचा समावेश आहे.

महानिर्मितीमध्ये कलावंतांची खाण असून कसदार अभिनय, संवाद फेक, संगीत,प्रकाश योजना, नेपथ्य आणि दिग्दर्शनाची उत्तम जाण, अनुभव असलेल्या गुणी कलावंतांमुळे ही स्पर्धा अत्यंत चुरशीची होणार आहे.

ज्येष्ठ रंगकर्मी संजय हल्दीकर (कोल्हापूर), बाळकृष्ण तिडके (नाशिक) आणि सौ. संगीता टिपले (नागपूर) यांचेकडे सदर नाट्यस्पर्धेच्या परीक्षणाची जबाबदारी देण्यात आली आहे.

तरी, नागपुरातील नाट्य रसिकांनी, नाट्य क्षेत्राशी निगडित व्यक्ती,पदाधिकारी तथा इच्छुकांनी या निःशुल्क दर्जेदार नाट्यकृतींचा भरपूर आस्वाद घ्यावा असे नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे अध्यक्ष तथा मुख्य अभियंता कोराडी वीज केंद्र विलास मोटघरे यांनी आवाहन केले आहे.

# Mahagenco Inter-Power Station Drama Competition from 2nd

■ **Staff Reporter**

THE annual Mahagenco Inter-Power Station Drama Competition is organised this year from July 2 to 6 at Scientific Hall, Laxmi Nagar. Each day, two dramas will be staged, one each in morning and evening.

The competition will be inaugurated at 9 am, and will conclude on July 6 at 6 pm in the presence of prominent dignitaries. Around 10 drama groups from different power stations of Mahagenco across Maharashtra are participating.

On July 2, 'Gaonbhag' drama will be staged by Koradi Thermal Power Plant at 11.30 am, 'Bhaanda Saukhya Bhare' by Uran Power Station at 6.30 pm.

On July 3, Koyna Hydroelectric Power Plant will present at 10 am, and 'Expiry Date' by Bhusawal Power Plant at 6 pm. On July 4, '2 Special' by Nashik Power Station at 10.30 am, and 'Yakshprashna' by Chandrapur Power Station at 6 pm.

On July 5, 'Anapekshit' by Paras Power Station at 10.30 am, 'Sanshayatma Vinashyati' by Parli Power Station at 6 pm. On July 6, 'Tiche Sandarbh Nasleli Gosht' drama by Sanghik Karyalaya (Prakashgarh) Mumbai at 10 am, 'Purnaviraam' by Khaparkheda Power Station at 4 pm.

Senior theatre artists Sanjay Haldikar from Kolhapur, Balkrishna Tidke from Nashik, and Sangeeta Tiple from Nagpur are the judges of the competition.

Vilas Motghare, Chief Engineer of Koradi Power Station and President of Drama Competition Organising Committee, informed through a press release that entry to the venue is free for audience.

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# शुभेच्छा संदेश

महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धा २ ते ६ जुलै नागपूर येथे आयोजित करण्यात आल्या असून याचे निमंत्रण प्राप्त झाले. वीज उत्पादन क्षेत्रातील धकाधकीच्या जीवनातून नाट्यकलेची रसिकता जोपासणाऱ्या महानिर्मितीच्या अधिकारी, अभियंते आणि कर्मचारी यांच्यासाठी नाट्यस्पर्धा हा अतिशय प्रेरणादायी उपक्रम आहे. या निमित्ताने छंद जोपासणे, आपले कला कौशल्य प्रदर्शित करण्याची नामी संधी आहे. इतर विद्युत केंद्रातील अधिकारी-कर्मचारी रंगकर्मी यांच्या भेटीगाठी होतात, संवाद साधता येतो आणि तणावमुक्त राहता येते.

मानवी जीवनाला जन्मतःच अभिनयाचे अंग मिळाले आहे. दैनंदिन जीवनात आपण वेगवेगळ्या भूमिका/व्यक्तिरेखा आवश्यकतेनुसार वठवीत असतो. मुलगा,भाऊ,वडील, आजोबा म्हणून प्रत्येक वेळी आपण वेगवेगळ्या भूमिका करीत असतो. घरी कधी आपण मुलगा म्हणून भाऊ म्हणून तर कधी वडिलांच्या भूमिकेत रक्ताच्या नात्यांशी किंवा आप्त स्वकीयांशी संवाद साधत असतो. तसेच बाह्यजगतात जसे शाळा, महाविद्यालये, कार्यालये यामध्ये वेळोवेळी आपण ज्यांच्याशी संवाद साधतो त्यांच्या समवेत भूमिका बदलवित असतो.

असे असले तरी अभिनय ही साधी-सोपी गोष्ट नाही हेही तितकेच खरे आहे. अभिनयासाठी वाचन, पाठांतर, शब्द फेक, वक्तृत्व, हावभाव, उत्तम वेळ साधता येणे आवश्यक आहे. याचाच अर्थ असा की आपल्याला "मल्टी टास्किंग" उत्तम प्रकारे येणे ही काळाची गरज बनली आहे.

झपाट्याने बदलत्या वीज क्षेत्रात आपल्याला "मल्टी टास्किंग" करणाऱ्या मनुष्यबळाची आता आवश्यकता आहे. ह्या नाट्यस्पर्धेत सहभागी असणाऱ्या गुणी, प्रतिभासंपन्न रंगकर्मी यांनी महानिर्मितीचा शाश्वत विकास साधण्यासाठी अधिकाधिक योगदान देण्याची गरज आहे.

स्पर्धेत उतरले की जय-पराजय होणारच आहे, मात्र नाट्यस्पर्धेत सहभागी होणे हा देखील मोठा जिकिरीचा सांघिक कार्याचा भाग आहे. सर्व विजेत्या कलावंतांचे आणि संघांचे मनापासून अभिनंदन करतो. या स्पर्धेच्या माध्यमातून नवीन ऊर्जा घेत आपण अधिक नवीन जोमाने आपले दैनंदिन कार्य पार पाडाल असा मला विश्वास आहे.



**डॉ.पी. अन्बलगन** (भा.प्र.से.)
अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक
महानिर्मिती

# कोणतेही वीज केंद्र जिंकले तरी अखेर विजय महानिर्मितीचाच होणार... श्री. पंकज सपाटे








वीज उत्पादनाचे दैनंदिन काम सांभाळून अतिशय कमी कालावधीत महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांमार्फत दर्जेदार नाट्यकृती सादर करण्यात येत आहे ही खऱ्या अर्थाने अभिनंदनीय बाब असून यातून सांघिक भावना व आपसांतील निकोप स्पर्धा वाढीस लागत असल्याचे कार्यकारी संचालक श्री. पंकज सपाटे यांनी सायंटीफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे प्रतिपादन केले. महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा उद्घाटनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाहून ते बोलत होते.

याप्रसंगी, विशेष अतिथी म्हणून मुख्य अभियंते श्री. किशोर राऊत, श्री. राजेशकुमार ओसवाल, श्री. शरद भगत, श्री. अरुण पेटकर तसेच श्री. विलास मोटघरे प्रामुख्याने उपस्थित होते.

महानिर्मितीच्या कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी हा मंच जास्तीत जास्त उपलब्ध व्हावा याबाबत त्यांनी काही विधायक सूचना मांडल्या. स्पर्धा म्हटली की जय-पराजय स्वाभाविक आहे आणि कोणताही नाट्यसंघ जिंकला तरी अखेर विजय महानिर्मितीचाच होणार असल्याचे श्री. सपाटे यांनी सांगितले.

उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता कोराडी वीज केंद्र श्री. विलास मोटघरे यांनी केले. सूत्र संचलन श्री. पराग लांबे आणि श्री. जयंत भातकुलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.

उद्घाटन समारंभाला महानिर्मितीचे उप मुख्य अभियंते श्री. अंकुर जोशी, श्री. भास्कर इंगळे, श्री. शैलेंद्र गारजलवार, अधीक्षक अभियंते सौ. भारती विजयकर, सौ. अरुणा भेंडेकर, सौ. सारिका सोनटक्के, सौ. किरण नानवटकर, श्री. राजेश डाखोळे, श्री. संतोष चंद्रमणी, श्री. सचिन भागेवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. पुरुषोत्तम वारजूरकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी श्री. यशवंत मोहिते, नाट्य स्पर्धा समन्वयक श्री. प्रवीण बुटे प्रामुख्याने उपस्थित होते.

नागपुरातील नाट्यरसिक, महानिर्मिती माजी नाट्य कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानिर्मितीच्या विविध वीज केंद्रांचे संघ व्यवस्थापक, कल्याण अधिकारी, सहाय्यक कल्याण अधिकारी, नाट्य कलावंत अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय यांची उपस्थिती लक्षणीय होती. नाट्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात नाट्य स्पर्धा आयोजन समितीचे मोलाचे सहकार्य लाभले.

उद्घाटन समारंभानंतर लगेच कोराडी वीज केंद्रातर्फे “गावभाग” तर सायंकाळी उरण वायू विद्युत केंद्रातर्फे “भांडा सौख्य भरे” या नाटकांचे प्रयोग सादर करण्यात आले.

कोराडी औष्णिक विद्युत केंद्र प्रस्तुत

# "गावभाग"







समाजात घडत आलेल्या चुकीच्या गोष्टी, किंवा समाजाला चुकीच्या वाटणाऱ्या 'बरोबर' गोष्टी, त्यामागे असणारी मानसिकता आणि प्रेक्षकांचे प्रबोधन यावर यथार्थपणे भाष्य करण्याचे सामर्थ्य असणारे सर्वांगसुंदर माध्यम म्हणजे 'नाटक'.

नाटकामधून निव्वळ मनोरंजन करण्यापेक्षा, प्रबोधन करत समाजाला आरसा दाखवावा यासाठी 'गावभाग' नाटक सादर करण्यात आले.

अतिशय सुंदर पद्धतीने लिहिल्या गेलेले, प्रत्येक प्रवेशागणिक प्रेक्षकांची उत्कंठा वाढवणारे आणि संपताना प्रेक्षकांना विचार करायला भाग पाडणारे 'गावभाग' हे नाटक प्रत्यक्षात उतरवणे तेवढेच जिकरीचे आणि कठीण काम असले तरी कोराडी नाट्य संघाने हे अवजड शिवधनुष्य उचलण्याचा यथाशक्ती प्रयत्न केला.

नेपथ्य, प्रकाश योजना, संगीत आणि रंगभूषा, वेशभूषा या नाटकाच्या जमेच्या बाजू असल्याने त्यावर देखील तंत्रज्ञ व कलाकारांनी उत्तम मेहनत घेतली.





सादरकर्ते : अभिनय कट्टा, कोराडी औष्णिक विद्युत केंद्र । निर्मिती प्रमुख : श्री. विलास मोटघरे, मुख्य अभियंता । मूळ संकल्पना : श्री. विशाल कदम कथा : श्री. अभिनव जेऊरकर । लेखक / दिग्दर्शक : श्री. मिलिंद चन्ने । सूत्रधार : श्री. मयूर मेंढेकर । संघ व्यवस्थापक : सौ. माधवी जांभुळकर नेपथ्य : श्री. सुनील नंदरधने आणि श्री. संदीप हिवरखेडकर । प्रकाश : श्री. जयंत प्रामाणिक आणि श्री. संतोष इटनकर । संगीत : श्री. स्वस्तिक चौरसे आणि श्री. सचिन डांगोरे । रंगभूषा, वेशभूषा : विद्या बाकडे आणि ममता वरठे । नाट्य सहाय्य : श्री. प्रणव जोशी, श्री. मनोज डाळिंबकर, श्री. स्वप्नील बोहटे, श्री. अनुप मेंढे, श्री. शंतनू जोशी, श्री. हर्षल चादेकर, गौरी देशमुख, ओवी ढवळे । रंगमंच व्यवस्था : श्री. महेश घुरिले, श्री. सुनील मेश्राम, आश्लेषा राणे, श्री. स्वप्नील उघडे, श्री. विलास उगे, श्री. ओमप्रकाश मडावी, श्री. संतोष गटमाने, श्री. रमेश वरठे । कलाकार : श्री. संजय सातफळे, श्री. शशांक गाढवे, वैष्णवी वंजाळकर, श्री. मिलिंद गवई, श्री. पंकज घाटोळे, श्री. विक्रांत मस्के, नेहा फुके-मस्के, विद्या बाकडे, श्री. प्रशांत नागापूरे, श्री.नाना घोंगे, श्री.गोपाळ राठोड, श्री.धनराज गावणेर, श्री. धीरज कांबळे, श्री.गटमाने, श्री. विभोर चोरसे बाल कलाकार : स्वर्णिका बाकडे ।

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

उरण वायु विद्युत केंद्र प्रस्तुत

# "भांडा सौख्य भरे"




घराघरात,जवळजवळ रोज होणारी नवरा-बायकोची भांडणे थांबली तर जगात किती शांतता नांदेल! पण प्रश्न असा आहे, नवरा बायको भांडतात का? त्याचे उत्तर असे आहे-नवरे 'मंगळा' वरून आलेले असतात तर बायका 'शुक्रा' वरून! दोघांच्या वागण्या-बोलण्यात जमीन आसमानाचा फरक असतो. तो समजून घेतला तर अक्षरश: जादू होऊ शकते. म्हणजे भांडणे संपतील असे नाही, पण प्रेमानं भांडावे कसे?' हे नक्की कळू शकेल. अगदी हसत खेळत ही 'कला' शिकवणारे खुसखुशीत नाटक....'भांडा सौख्य भरे'






**सादरकर्ते :** उरण वायु विद्युत केंद्र । **निर्मिती प्रमुख :** श्री. प्रफुल्ल भदाणे, मुख्य अभियंता । **सह-निर्माता :** श्री. अधीक्षक अभियंता (संचलन व सुव्यवस्था) । **लेखक :** श्री. शिवराज गोर्ले । **दिग्दर्शक :** श्री. जगन्नाथ कचरे । **सह-दिग्दर्शक :** सौ. प्रियंका पाटील । **नेपथ्य :** श्री. नितीन जाधव, श्री. सुनील पेढवी । **प्रकाश योजना :** श्री. शितल टारे, श्री. विलास गावडे । **संगीत :** श्री. समीर घरत, श्री. सागर मारकड ।
**वेशभूषा :** प्रियंका बुरड, अरिका कासकर, मंजुषा चांगण । **विशेष सहाय्य व मार्गदर्शन :** श्री. अनिल शिंदे, श्री. वसंत स्वामी ।
**कलाकार :** श्री. जगन्नाथ कचरे, प्रियंका बुरड, श्री. देवेंद्र जोशी, प्रियांका पाटील, श्री. समीर घरत, अरिका कासकर, श्री. नितीन जाधव, श्री. सागर मारकड, श्री. सुनील पेढवी, मंजुषा चांगण, श्री. विलास गावडे, श्री. शितल टारे ।

# माध्यमांच्या नजरेतून

## सांघिक भावना, निकोप स्पर्धेला चालना- सपाटे

महानिर्मिती नाट्यस्पर्धेचे दिमाखदार उद्घाटन

आजचे प्रयोग

## कोणीही जिंकलं तरी विजय महानिर्मितीचाच होणार : पंकज सपाटे

**महानिर्मिती नाट्यस्पर्धेचे उद्घाटन**



**आज होणारे नाटक**

सकाळी १०.३० वा. 'कार्टी नंबर १' सादरकर्ते कोयना जल विद्युत केंद्र. सायंकाळी ६ वाजता : 'एक्सपायरी डेट' सादरकर्ते-भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र.

पुण्य नगरी / प्रतिनिधी

नागपूर : वीज उत्पादनाचे दैनंदिन काम सांभाळून अतिशय कमी कालावधीत महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांमार्फत दर्जेदार नाट्यकृती सादर करण्यात येत आहे. ही खऱ्या अर्थाने अभिनंदनीय बाब असून यातून सांघिक भावना व आपसातील निकोप स्पर्धा वाढीस लागत असल्याचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे म्हणाले.

लक्ष्मीनगरातील सायंटिफिक सभागृहात आयोजित महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेच्या उद्घाटनपर कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. यावेळी विशेष अतिथी म्हणून मुख्य अभियंते किशोर राऊत, राजेशकुमार ओसवाल, शरद भगत, अरुण पेटकर व विलास मोटघरे उपस्थित होते. महानिर्मितीच्या कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी हा मंच जास्तीत जास्त उपलब्ध व्हावा याबाबत त्यांनी काही विधायक सूचना मांडल्या. स्पर्धा म्हटली की जय-पराजय स्वाभाविक आहे आणि कोणताही नाट्यसंघ जिंकला तरी अखेर विजय महानिर्मितीचाच होणार असल्याचे पंकज सपाटे यांनी सांगितले. याप्रसंगी अंकुर जोशी, भास्कर इंगळे, शैलेंद्र गारजलवार, भारती विजयकर, अरुणा भेंडेकर, सारिका सोनटक्के, किरण नानवटकर, राजेश डाखोळे, संतोष चंद्रमणी, सचिन भागेवार, पुरुषोत्तम वारजूरकर, यशवंत मोहिते व प्रवीण बुटे उपस्थित होते. प्रास्ताविक विलास मोटघरे यांनी, तर संचालन पराग लांबे व जयंत भातकुलकर यांनी केले. आभार मयूर मेंढेकर यांनी मानले.

## नाट्य स्पर्धेमुळे सांघिक भावनेची निर्मिती : पंकज सपाटे

राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचे थाटात उद्घाटन

## २ जुलै पासून नागपुरात महानिर्मितीची नाट्यस्पर्धा

नाट्य रसिकांसाठी पर्वणी

## वीजकर्मचाऱ्यांच्या अभिनयाने उजळला रंगमंच

## लोकमत

महानिर्मिती नाट्य स्पर्धेस सुरुवात : चार दिवस चालेल नाट्य महोत्सव

## 'गावभाग' व 'भांडा सौख्यभरे'ने वाजला बिगुल



महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेला शानदार सुरुवात झाली. एका नाटकातील हा क्षण.

**आजची नाटके**

- सकाळी १०:३० वा. 'कार्टी नंबर १', सादरकर्ते- कोयना जलविद्युत केंद्र
- सायंकाळी ६ वाजता : 'एक्सपायरी डेट' सादरकर्ते- भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र

लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : लक्ष्मीनगरच्या सायंटिफिक सभागृहात मंगळवारपासून महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेला शानदार सुरुवात झाली. पहिल्याच दिवशी सकाळी कोराडी औष्णिक विद्युत केंद्रातर्फे 'गावभाग' आणि सायंकाळी उरण वायू विद्युत केंद्रातर्फे 'भांडा सौख्यभरे' या विनोदी नाटकाने या नाट्य महोत्सवाचा बिगुल वाजला.

तत्पूर्वी सकाळी महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे यांच्या हस्ते या नाट्य स्पर्धेचे उद्घाटन झाले. वीज उत्पादनाचे दैनंदिन काम सांभाळून महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांमार्फत दर्जेदार नाट्यकृती सादर करण्यात येत आहे. यातून सांघिक भावना व आपसातील निकोप स्पर्धा वाढीस लागत असल्याची भावना त्यांनी व्यक्त केली.

महानिर्मितीच्या कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी हा मंच जास्तीत जास्त उपलब्ध व्हावा, याबाबत त्यांनी काही विधायक सूचना मांडल्या. याप्रसंगी मुख्य अभियंते किशोर राऊत, राजेशकुमार ओसवाल, शरद भगत, अरुण पेटकर, कोराडी वीज केंद्राचे मुख्य अभियंता विलास मोटघरे तसेच महानिर्मितीचे उपमुख्य अभियंता अंकुर जोशी, भास्कर इंगळे, शैलेंद्र गारजलवार, अधीक्षक अभियंता भारती विजयकर, अरुणा भेंडेकर, सारिका सोनटक्के, किरण नानवटकर, राजेश डाखोळे, संतोष चंद्रमणी, सचिन भागेवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजूरकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, नाट्य स्पर्धा समन्वयक प्रवीण बुटे प्रामुख्याने उपस्थित होते. प्रास्ताविक विलास मोटघरे यांनी केले. सूत्रसंचालन पराग लांबे आणि जयंत भातकुलकर यांनी केले. मयूर मेंढेकर यांनी आभार मानले. नागपुरातील नाट्यरसिक, महानिर्मिती माजी नाट्यकलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानिर्मितीच्या विविध वीज केंद्रांचे संघ व्यवस्थापक, कल्याण अधिकारी, सहायक कल्याण अधिकारी, नाट्यकलावंत अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय यांची उपस्थिती लक्षणीय होती. नाट्य स्पर्धेच्या यशस्वी आयोजनात नाट्य स्पर्धा आयोजन समितीचे मोलाचे सहकार्य लाभले.

Hello Nagpur
Page No. 4 Jul 03, 2024
Powered by: erelego.com

## महानिर्मिती नाट्य स्पर्धेचे थाटात उद्घाटन

उद्घाटनप्रसंगी उपस्थित मान्यवर

आज दोन नाट्यप्रयोग

## महानिर्मिती नाट्यस्पर्धेचे शानदार उद्घाटन

कोणतेही वीज केंद्र जिंकले तरी अखेर विजय महानिर्मितीचाच होणार - पंकज सपाटे

## नाट्य स्पर्धेतून सांघिक भावनेसह निकोप स्पर्धा - सपाटे

लोकसत्ता प्रतिनिधी

महानिर्मिती नाट्य स्पर्धेचे उद्घाटन

आज होणारे नाट्यप्रयोग

...कोराडी वीज केंद्र विलास मोटघरे यांनी केले. सूत्रसंचालन पराग लांबे आणि जयंत भातकुलकर यांनी केले तर आभार मयूर मेंढेकर यांनी मानले. यावेळी महानिर्मितीचे उपमुख्य अभियंते अंकुर जोशी, भास्कर इंगळे, शैलेंद्र गारजलवार, अधीक्षक अभियंते भारती विजयकर, अरुणा भेंडेकर, सारिका सोनटक्के, किरण नानवटकर, राजेश डाखोळे, संतोष चंद्रमणी, सचिन भागेवार, पुरुषोत्तम वारजूरकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, नाट्यस्पर्धा समन्वयक प्रवीण बुटे उपस्थित होते.

## Mahagenco theatre festival opens with power & passion

Chaitanya.Deshpande@timesgroup.com



Play 'Bhanda Saukhay Bhare' was presented by Uran Vayu Vidyut Kendra at Scientific Hall, on Tuesday

Nagpur: The Maharashtra State Power Generation Company Ltd (Mahagenco) kicked off its annual theatre competition in Nagpur at the Scientific Society Hall on Tuesday. This event which is a decades-long tradition, brings together employees, officers, and their families from ten power plants across the state for a Marathi theatre extravaganza.

Executive Director Pankaj Sapate inaugurated the competition, commending the dedication of Mahagenco staff who juggle power generation with their artistic pursuits. He emphasized how this platform fosters teamwork within the company and encouraged artists to utilize this platform for showcasing their talent. He also reminded everyone that winning and losing are part of the game, and ultimately, Mahagenco emerges victorious through such cultural endeavours.

The opening ceremony was graced by the presence of chief engineers Kishore Raut, Rajeshkumar Oswal, Sharad Bhagat, Arun Petkar, and Vilas Motghare. Koradi Thermal Power Station (KTPS) chief engineer Vilas Motghare formally declared the competition as open.

Mahagenco's deputy chief engineers Ankur Joshi, Bhaskar Ingle, Shailendra Garjalwar, superintending engineers Bharti Vijaykar, Aruna Bhendekar, Sarika Sontakke, Kiran Nanwatkar, Rajesh Dakhole, Santosh Chandramani, Sachin Bhagewar and chief industrial relations officer Purushottam Warjurkar attended the ceremony. Chief public relations officer Yashwant Mohite, drama competition coordinator Praveen Bute were also present.

Following the inauguration, KTPS presented the thought-provoking play 'Gaavbhaag.' This powerful drama aimed to spark social reflection and challenged societal norms. The evening concluded with a performance by Uran Power Station's 'Bhanda Soukhyabhare'. This light-hearted play explored the dynamics of married life, offering humorous insights into the communication gap between partners.

The Mahagenco Theatre Festival continues on July 3 with "Karti No. 1" by Koyna Jal Vidyut Kendra in the morning and "Expiry Date" by Bhusawal Thermal Power Station in the evening. Power stations from Eklahare (Nashik), CSTPS (Chandrapur), Paras, Parali, Khaparkheda, and the team from Mahagenco's head office in Mumbai will also present their plays. The result will be declared on July 6, right after the concluding play and prize distribution will be done right then.

## स्थानीय

विदर्भ की बात 8

नागपुर, 3 जुलाई 2024

## महानिर्मिती की नाट्य प्रतियोगिता का भव्य उद्घाटन

कोई भी पावर स्टेशन जीते, अंत में जीत महानिर्मिती की होगी - सपाटे

## Mahagenco Inter Power Station drama competition till July 6



Artists staging a play during the competition's inaugural day on Tuesday at Scientific Hall, Laxmi Nagar.

■ Staff Reporter

THE ANNUAL Mahagenco's State-level Inter Power Station Drama Competition inaugurated on Tuesday and will go on till July 6 at Scientific Hall, Laxmi Nagar.

Each day two dramas will be staged, one each in morning and evening. Around 10 drama groups from different power stations of Mahagenco across Maharashtra are participating.

Chief Engineers Kishore Raut, Rajeshkumar Oswal, Sharad Bhagat, Arun Petkar, and Vilas Motghare were the chief guests. Pankaj Sapate, Executive Director, presided over the programme.

Sapate addressed the gathering and said that the competition is an opportunities for Mahagenco's employees to unleash their skills.

The first day began with 'Gaonbhag' drama by Koradi Thermal Power Plant and 'Bhaanda Saukhya Bhare' by Uran Power Station. On July 3, Koyna Hydroelectric Power Plant will present 'Kaarti Number 1' at 10 am, and 'Expiry Date' by Bhusawal Power Plant at 6 pm.

Senior theatre artists Sanjay Haldikar from Kolhapur, Balkrishna Tidke from Nashik, and Sangeeta Tiple from Nagpur are the judges of the competition.

Deputy Chief Engineers Ankur Joshi, Bhaskar Ingle, Shailendra Garjalwar; Superintendent Engineers Bharti Vijaykar, Aruna Bhendekar, Sarika Sontakke; Purushottam Varjurkar, Chief Industrial Relations Officer; Yashwant Mohite Chief Public Relation Officer; and Pravin Bute, Programme Coordinator; and other officers were also present on the occasion.

Parag Lambe and Jayant Bhatkulkar conducted the proceedings of the programme while Mayur Mendhekar presented vote of thanks.

Entry to the venue is free for audience.

## दैनिक जनप्रभात

Page 3
04 Jul 2024

## कोणतेही वीज केंद्र जिंकले तरी अखेर विजय महानिर्मितीचाच होणार: पंकज सपाटे

### महानिर्मिती नाट्यस्पर्धेचे शानदार उद्घाटन



नागपूर ■ दिलीप येवले

वीज उत्पादनाचे दैनंदिन काम सांभाळून अतिशय कमी कालावधीत महानिर्मितीच्या कर्मचाऱ्यांमार्फत दर्जेदार नाट्यकृती सादर करण्यात येत आहे ही खऱ्या अर्थाने अभिनंदनीय बाब असून यातून सांघिक भावना व आपसातील निकोप स्पर्धा वाढीस लागत असल्याचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे यांनी सायंटीफिक सभागृह, लक्ष्मीनगर, नागपूर येथे प्रतिपादन केले. महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा उद्घाटनपर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानाहून ते बोलत होते. याप्रसंगी, विशेष अतिथी म्हणून मुख्य अभियंते किशोर राऊत, राजेशकुमार ओसवाल, शरद भगत, अरुण पेटकर तसेच विलास मोटघरे प्रामुख्याने उपस्थित होते.

महानिर्मितीच्या कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी हा मंच जास्तीत जास्त उपलब्ध व्हावा याबाबत त्यांनी काही विधायक सूचना मांडल्या. स्पर्धा म्हटली की जय-पराजय स्वाभाविक आहे आणि कोणताही नाट्यसंघ जिंकला तरी अखेर विजय महानिर्मितीचाच होणार असल्याचे सपाटे यांनी सांगितले. उद्घाटन समारंभाचे प्रास्ताविक मुख्य अभियंता कोराडी वीज केंद्र विलास मोटघरे यांनी केले. सूत्र संचलन पराग लांबे आणि जयंत भातकुलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन मयूर मेंढेकर यांनी केले.

उद्घाटन समारंभाला महानिर्मितीचे उप मुख्य अभियंते अंकुर जोशी, भास्कर इंगळे, शैलेंद्र गारजलवार, अधीक्षक अभियंते भारती विजयकर, अरुणा भेंडेकर, सारिका सोनटक्के, किरण नानवटकर, राजेश डाखोळे, संतोष चंद्रमणी, सचिन भागेवार, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी पुरुषोत्तम वारजूरकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, नाट्यस्पर्धा समन्वयक प्रवीण बुटे प्रामुख्याने उपस्थित होते.

नागपुरातील नाट्यरसिक, महानिर्मिती माजी नाट्य कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते. महानिर्मितीच्या विविध वीज केंद्रांचे संघ व्यवस्थापक, कल्याण अधिकारी, सहाय्यक कल्याण अधिकारी, नाट्यकलावंत अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय यांची उपस्थिती लक्षणीय होती. नाट्यस्पर्धेच्या यशस्वी आयोजनात नाट्यस्पर्धा आयोजन समितीचे मोलाचे सहकार्य लाभले. उद्घाटन समारंभानंतर लगेच कोराडी वीज केंद्रातर्फे 'गावभाग' तर सायंकाळी उरण वायू विद्युत केंद्रातर्फे 'भांडा सौख्य भरे' या नाटकांचे प्रयोग सादर करण्यात आले.

भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र प्रस्तुत

# “एक्सपायरी डेट”

आई वडील कष्ट करून आपल्या मुलांना उच्च शिक्षण देतात आणि ही मुलं परदेशात गडगंज रुपयाची नोकरी करतात आणि आपल्या आई वडिलांच्या परिश्रमाला विसरून स्वत:मध्ये गुंतून जातात. त्यांच्याकडे आई-वडील, आप्तेष्ठांसाठी वेळच नाही आणि अचानकपणे त्यांना कोणत्याही कारणासाठी आपल्या आई-वडिलांना भेटणे सुद्धा अशक्य होऊन जाते. त्यासाठी मुलं आपल्या आई-वडिलांची ‘एक्सपायरी डेट’ डॉक्टरांकडून काढून घेतात आणि त्यानुसार ते आपल्या प्रवासाचा निश्चय करतात. आपल्या या अति-गतिमान जगात मानवाची ‘एक्सपायरी डेट’ काढणे ही मन हेलवणारी कथा आहे. मानवी मनाला चटका देणारे, किंबहुना अनुत्तरीत प्रश्नांची उत्तरं शोधणारे हे नाटक आणि या गंभीर विषयाला विनोदी अंगाने लिहून लेखकाने समाजाला जागे करण्याचा प्रयत्न केला आहे.













सादरकर्ते : दीपरंग नाट्य संघ, भुसावळ औष्णिक विद्युत केंद्र । निर्मिती प्रमुख : श्री. मोहन आव्हाड, मुख्य अभियंता ।
लेखक : श्री. चैतन्य सरदेशपांडे । दिग्दर्शक : श्री. प्रवीण मोरे । सूत्रधार : श्री. मुकेश मेश्राम । सह सूत्रधार : श्री. पंकज सनेर ।
संघ व्यवस्थापक : श्री. रोशन वाघ । नेपथ्य : श्री. रोशन वाघ । नेपथ्य सहाय्य : श्री. स्वप्नील जाधव, श्री. मोहित कांबळे ।
प्रकाश योजना : श्री. अतुल बऱ्हाटे, श्री. रोशन भगत । प्रकाश योजना सहाय्य : श्री. दिपक ढाके । संगीत : श्री. मोहित कांबळे ।
संगीत सहाय्य : श्री. राजेंद्र पवार । रंगभूषा / वेशभूषा : ज्योती चंद्रमोरे । रंगभूषा / वेशभूषा सहाय्य : प्रतीक्षा काळे, सपना तिवारी, प्रगती गित्ते ।
रंगमंच व्यवस्था : श्री. विजय वाघ, श्री. नितीन सोनवणे, श्री. परेश पचलोड, श्री. संतोष शेळके, श्री. संतोष गिऱ्हे । कलाकार : श्री. प्रवीण मोरे, श्री. शुभम गुडा, ऐश्वर्या खोसे, सविता शर्मा, श्री. केशव भगत, श्री. प्रदीप जांभुळकर, श्री. रोशन वाघ, श्री. महेश होनमाने ।
ऋणनिर्देश : श्री. चंद्रकांत सपकाळे, श्री. चंद्रकांत जाडकर

नाशिक औष्णिक विद्युत केंद्र प्रस्तुत

# "दोन स्पेशल"

"दोन स्पेशल" ही एक अत्यंत तरल, त्यात अंतर्भूत असलेल्या दोन्ही जीवांच्या मनाविरुद्ध अपूर्ण राहिलेली प्रेमकथा आहे. त्यातील प्रियकर आणि प्रेयसी – मिलिंद भागवत आणि स्वप्ना जोग हे वृत्तपत्राच्या कार्यालयातील पत्रकारितेच्या क्षेत्रात काम करत असतात. मिलिंद भागवत हा एक अत्यंत तत्वनिष्ठ, निर्मळ मनाचा, मध्यमवर्गीय आणि पेशाने उपसंपादक आहे. त्यामुळे या कथेला शुद्ध पत्रकारिता या पेशाचा पाया लाभलेला आहे. काही अनपेक्षित घटनांमुळे, समज–गैरसमज, कौटुंबिक आणि सामाजिक दबावाखाली हें प्रेमी युगुल विभक्त होत. त्यानंतर खूप कालावधी नंतर त्यांची अचानक भेट होते.

अत्यंत जीवापाड प्रेम असलेल्या प्रेयसीच्या जीवनातला अत्यंत विपरीत असा ताण सोडवण्यासाठी होते सुद्धा तो आपल्या पत्रकारितेची मूलभूत मूल्य अजिबात सोडायला तयार नाही.

यातूनच प्रेयसीने त्याच्या प्रेमाशी प्रतारणा केली असा निर्माण झालेला आभास, त्याला असलेली विचित्र पार्श्वभूमी यातून निर्माण झालेला आणि शेवटी एका अवघड प्रसंगावर सुटलेला गुंता यामुळे हे नाटक प्रेक्षकांच्या मनाची पकड घेतं. व्यवहार आणि नैतिक मूल्य सांभाळत, स्वत:च्या तत्वांना घट्ट चिकटून आपले निर्दोषत्त्व सिद्ध करण्याची जीवापाड संघर्ष करीत धडपड यातून दिसते. काहीही पर्याय शिल्लक राहात नाही.

सरते शेवटी प्रेम, व्यवहार, नैतिक मूल्य, आदर्श या दोलायमान अवस्थेत कुणाचा विजय होतो ? ही गुंतागुंत सुटते की तशीच राहते ?

हे दाखवणारे नाटक म्हणजे "दोन स्पेशल".









सादरकर्ते : रंगसाधना, नाशिक औष्णिक विद्युत केंद्र, एकलहरे । लेखक : श्री. क्षितीज पटवर्धन । दिग्दर्शक : श्री. शशिकांत पवार । निर्माता : श्री. राजेश मोराळे, मुख्य अभियंता । सहनिर्माता : श्री. प्रशांत लोटके, उप मुख्य अभियंता (सं व सु) । विशेष सहकार्य : श्री. प्रविण गोसावी, श्री. संतोष कुलकर्णी, श्रीमती. गीतांजली पारखी (नाशिक प्रशिक्षण केंद्र) । विशेष आभार : सर्व विभाग प्रमुख, सर्व अधिकारी-कर्मचारी (नाशिक औ.वि. केंद्र) । सूत्रधार : श्री. निवृत्ती संपत कोंडावले, श्रीमती. किर्ती विश्वास ठाकरे । संघ व्यवस्थापक : श्री. प्रभाकर बी. रेवगडे । नेपथ्य : श्री. विजय साळवे । प्रकाश योजना : श्री. प्रभाकर बी. रेवगडे । संगीत : श्री. गौरव पुणेकर । रंगभूषा / वेशभूषा : श्री. राजेश धामणे । रंगमंच व्यवस्था : श्री. राजेश धामणे, श्री. महेश तुपे, श्री. प्रविण काळोखे । ऋणनिर्देश : श्री. तेजस बिल्दीकर, श्री. कुणाल वाईकर, श्री. सुयश लोथे, सौ. रश्मी काळोखे, श्री. दिगंबर इंगळे आणि श्री. विष्णु पगारे । कलाकार : श्री. निलेश राऊत, सौ. शृंजल शिंदे, श्री. संग्राम भालेराव, श्री. प्रभाकर रेवगडे, श्री. गौरव पुणेकर, श्री. महेश तुपे, श्री. शशिकांत पवार, श्री. राजेश धामणे ।

परळी औष्णिक विद्युत केंद्र प्रस्तुत

# “संशयात्मा विनश्यती”

भगवद्गीतेच्या चौथ्या अध्यायातील ४० व्या श्लोकावर आधारित डॉक्टर समीर मोने लिखित “संशयात्मा विनश्यती” हे नाटक भाष्य करते.

सर्व सुख सोयी पायाशी असताना सुद्धा हा संशयरुपी भुंगा माणसाच्या सुखाला, आयुष्याला आतून पोखरतच असतो. “संशयात्मा विनश्यती” या नाटकाचे कथानक एका वयस्कर पती व त्याहून किंचित तरुण वयाची पत्नी यांच्या नातेसंबंध व सतत संशय घेण्याच्या सवयीमुळे, नात्यात येणारा दुरावा, याभोवती फिरते.

नाटकाच्या सुरुवातीलाच पती व पत्नी एका पडक्या वाड्यात प्रवेश करतात,त्यांच्या संवादांमधून असे लक्षात येते की, त्यांची गाडी अपघातातून वाचली आहे व पावसामध्ये बंद पडली आहे. ‘आज आपण मरणार आहोत’, या संशयाने पतीची अवस्था खूप बिकट झाली आहे...प्रत्येक घटनेचा संबंध तो आपल्या मृत्यूशी जोडत असतो आणि त्याच्या या संशयी स्वभावाला बायको कंटाळलेली असते आणि अचानक एका गूढ पात्राची,अर्थात वाड्याच्या मालकाची एन्ट्री नाटकात होते. नाटकातील गूढ व रोमांच वाढत जाते. हे मालकाचे पात्र या जोडप्याला जीवनाचे सार सांगत,त्यांच्या नातेसंबंधातील दुराव्यावर भाष्य करते. मध्यंतर होत असताना, नाटक अचानक वेगळेच वळण घेते व ते तिघेही अपघातात मृत झालेले आहेत, असे सगळ्यांच्या लक्षात येते व मध्यांतर होतो.

मध्यंतरानंतर तो वृध्द मालक अचानक गायब होतो व पती–पत्नीचे वाद चालूच असतात व एका वळणावर पतीला आपला भूतकाळ, जीवनपट आठवायला लागतो. या सर्व प्रसंगांमधून असे लक्षात येते की, पतीच्या सतत संशय घेण्याच्या सवयीमुळे, पत्नी त्याच्या पासून दुरावत जाते व त्याला वठणीवर आणण्यासाठी आपल्या मित्राच्या मदतीने बाहेर आपले खोटे प्रेम प्रकरण असल्याचे पतीला भासवते. हे गुपित सांगितल्यावर दोघांतील दुरावा काही अंशी कमी होतो. परंतु पतीच्या संशयी आत्म्याला आपला मृत्यू जवळ आलाय असे भास व्हायला लागतात. आपण तीन दिवसात मरणार, असे मृत्यूदूत त्याला येऊन सांगत असल्याचे कळते.

त्यामुळे ते देवदर्शनासाठी म्हणून बाहेर पडतात व भूतकाळ संपून आपण परत वर्तमानात येतो. पत्नीचा आपण मेलो आहोत, या घटनेवर अजूनही विश्वास नसतो. थोड्या वेळाने परत त्या वृद्ध मालकाची एन्ट्री होते व तो त्यांना आपण सर्व मृत असल्याचा पुनरुच्चार करतो व गाडी दरीत पडली आहे असे सांगतो. दरीत वाकून पाहण्यासाठी त्या पतीला प्रवृत्त करतो. वाकून पाहताना त्याचा तोल जाऊन तो दरीत पडल्याचे समजते व पत्नी रडायला लागते, तेव्हा अचानक तो वृद्ध मालक आपले खरे रूप प्रकट करतो व तो मालक दुसरा तिसरा कोणी नसून, पत्नीचा मित्र असल्याचे समजते व परत एकदा नाटक वेगळे वळण घेते. पत्नीने आपल्या मित्राच्या मदतीने तिच्या पतीला संपवण्याचा प्लॅन केलेला असतो, हे रहस्य उलगडते व संशयी आत्म्याचा, तिच्या पतीचा शेवट झाला म्हणून दोघेही आनंदित होतात. परंतु, त्याच्यापासून खरंच आपला पिच्छा सुटला आहे, या बद्दल दोघेही साशंकच असतात आणि त्यांचा हाच संशय खरा ठरतो व तो पती परत घरात येतो,हे दोघे घाबरतात व त्याला परत कसे आलात म्हणून विचारतात तेव्हा,ते पतीचे भूत आहे व त्यांच्या मानगुटीवर बसायला आले आहे हे समजते,अशा पद्धतीने त्यांचा संशय त्यांच्या विनाशाला कारणीभूत कसा ठरतो आणि धक्क्यावर धक्के देत,नाटकाचा शेवट होतो...









सादरकर्ते : अश्वमेध नाट्य संघ, परळी औष्णिक विद्युत केंद्र । निर्मिती प्रमुख : श्री. सी.एस. इंगळे, मुख्य अभियंता । लेखक : डॉ. समीर मोने ।
दिग्दर्शक : सोनाली डोंगरे । सहदिग्दर्शक : श्री. प्रदीप लेंडवे । संघ व्यवस्थापक : पवित्रा डोंगरे । नेपथ्य : श्री. यशवंत पवार ।
प्रकाश योजना : श्री. दिनेश कदम । संगीत : श्री. प्रशांत पांडे, पल्लवी शिराळे । रंगभूषा / वेशभूषा : गौरी लेंडवे ।
रंगमंच व्यवस्था : श्री. प्रदीप भुक्तर । ऋणनिर्देश : श्री. मिलिंद चन्ने, श्री. संजय सातफळे, श्री. महेश होनमाने ।
कलाकार : श्री. प्रसाद निर्मळे, श्री. अभिषेक वाघमारे, सोनाली डोंगरे ।

### चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र प्रस्तुत

# "यक्षप्रश्न"

मध्यमवर्गीय कुटुंब, त्यात वडील सेवानिवृत्त, मुलगा मार्केटिंग कंपनीत नोकरीला, सून एका खाजगी शाळेत शिक्षिका अशा कुटुंबात दोन नातवंडे. त्यात मुलगा (नातू) अभियांत्रिकीचे शिक्षण घेतोय तर मुलीला (नात) डॉक्टर व्हायचं आहे.

अशा सुख-वस्तू कुटुंबात अचानक घटना घडते ती म्हणजे वडील पक्षाघात (paralysis) होऊन कोमामध्ये जातात. या परिस्थितीमध्ये कुटुंबासमोर उभा राहतो, तो 'यक्षप्रश्न' ज्यांनी संपूर्ण आयुष्य सुखा समाधानात जगून काढलं त्यांना जगवायच की, ज्यांच्या आयुष्याची सुरुवात होते आहे त्यांचं भविष्य घडवायचं ?

अशा यक्षप्रश्नात गुरफटलेल्या कुटुंबात सुनेचा भाऊ येतो आणि आलेल्या यक्षप्रश्नावर उपाय शोधण्याचा प्रयत्न करतो. सूनेच्या भावाने या यक्षप्रश्नावर शोधलेला उपाय योग्य की अयोग्य हा तिढा मात्र रसिक प्रेक्षकांवर सोपवलेला आहे.








सादरकर्ते : चंद्रपूर महाऔष्णिक विद्युत केंद्र । लेखक : श्री. सुनिल देशपांडे । दिग्दर्शक : श्री. विष्णू पगारे ।
निर्मिती प्रमुख : श्री. गिरीश कुमरवार, मुख्य अभियंता । निर्मिती सहाय्य : श्री. शाम राठोड, डॉ. भूषण शिंदे, श्री. प्रफुल्ल खुटेमाटे, श्री. अनिल पुनसे (उप मुख्य अभियंते) । सूत्रधार : श्री. दिलीप वंजारी, कु. राणू कोपटे । संघ व्यवस्थापक : श्री. ज्ञानदिप कोकाटे । नेपथ्य : श्री. दिगंबर इंगळे ।
नेपथ्य सहाय्य : श्री. पंकज पाटील । प्रकाश योजना : श्री. विष्णू पगारे । प्रकाश योजना सहाय्य : श्री. प्रमोद बाळबुधे ।
संगीत : श्री. राहुल आसावा । संगीत सहाय्य : श्री. दिलीप मार्कंडे । रंगभूषा / वेशभूषा : श्री. शैलेश काळे ।
रंगमंच व्यवस्था : श्री. जयंत देठे, श्री. प्रशांत चव्हाण । विशेष सहकार्य : श्री. संजय रामटेके, श्री. आलेख कोटरंगे ।
कलाकार : सायली देठे, श्री. राजेंद्र पोईनकर, श्री. ज्ञानदिप कोकाटे, साधना चव्हाण, श्री. सुदीप गुठे, श्री. सदाशिव आघाव ।








# स्नेहमिलन








मुख्यालय, मुंबई प्रस्तुत

# “तिचे संदर्भ नसलेली गोष्ट”









तो एक अशी स्त्री आहे जी घराच्या चार भिंतीतून बाहेर पडण्याचे, नागरिक म्हणून मोठी जबाबदारी स्वीकारण्याचे आणि समाज घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावण्याचे स्वप्न पाहते. तिच्या या नवीन प्रयत्नात ती विविध आव्हाने पेलते. पण, कालांतराने आपण या ध्येयपूर्तीसाठी आपल्या आयुष्यातील काय अनमोल खजिना हरवून बसलो आहोत, याची तिला जाणीव होते. आणि ती पुन्हा स्वत:च मागे सोडून आलेल्या आपल्या सुंदर जगात परत जाण्याचे ठरवते.

अशा प्रकारे, सामाजिक भूमिका आणि व्यक्तिगत आयुष्य यातला समतोल न साधता आलेल्या आणि जीवनातले सारेच संदर्भ अस्ताव्यस्त होऊन जगण्यातल्या साऱ्याच नात्यांचा चेहरा हरवलेल्या एका स्त्रीची कथा म्हणजेच ‘तिचे संदर्भ नसलेली गोष्ट’.

**सादरकर्ते :** सांघिक कार्यालय, मुंबई ।
**निर्माते :** डॉ. धनंजय सावळकर, कार्यकारी संचालक (मासं) ।
**मूळ संकल्पना :** श्री. राजन खान । **लेखक :** श्री. राहुल शेंडे ।
**दिग्दर्शक :** श्रीमती. ज्योती हंकारे । **नेपथ्य :** श्री. समीर म्हस्के, श्री. संतोष पुरोहित । **प्रकाश योजना :** श्री. हेमंत सरोदे ।
**संगीत :** श्रीमती. ज्योती हंकारे, श्री. आदित्य परब ।
**रंगभूषा / वेशभूषा :** श्रीमती. रुपाली उफाडे, श्री. विनायक घाटी
**कलाकार :** श्री. सचिन मोडकरवार, श्रीमती. गीतांजली झिरमुटे, श्री. समीर म्हस्के, श्रीमती. ज्योती हंकारे, श्रीमती. अनिता गायकवाड । **बाल कलाकार :** कु. रुही सरोदे ।





महानिर्मिती

खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र प्रस्तुत

# “पूर्णविराम”





**मेरे उजडे इस गुलशन की**
**अब तक न मिली बहार मुझे ।**
**मैने लाखोंके बोल सहे**
**सावरीयां तेरे लिए ।।**

कलावंत हा नेहमी मनस्वी असतो. कलावंताची नेहमी कला पहावी, त्याच्या आयुष्यामध्ये डोकावून पाहू नये, असे म्हणतात. कलावंताचे कलंदर जगणं सर्वसामान्य व्यक्तीस सहन होणार नाही असंच असतं. कलावंत नेहमी पूर्णत्वाच्या शोधात असतो. या शोधामध्ये त्याच्यासोबत असणाऱ्या व्यक्तींची वाटचाल कधी सुखावह ठरते तर कधी त्यांचीही फरफट होते. पुरुष कलावंतांची पत्नी होणं हे तर एक दिव्यच. कलावंत कधी विक्षिप्तपणे वागतो तर कधी अट्टहासाने. आपलेच म्हणणे खरे करतो व बहुतांश वेळा यासोबत येते व्यसनाधीनता. कलंदर आयुष्य जगतांना हे जगरहाटी, समाजनियमांची तमाही बाळगत नाहीत. यामुळेच कलावंत काळाच्या पुढे जाऊन या जगाची कल्पना मांडत असतात. जगण्याचे नवे आयाम शोधत असतात. कळत नकळत याचा परिणाम मात्र त्यांच्या आयुष्यातील सर्वच व्यक्तींवर होतो. बहुतांश वेळा कलाकाराचं आयुष्य हे फक्त कलेला न्याय देऊ शकतं, त्याच्या आयुष्यातील व्यक्तींना नाही. हे विदारक सत्य स्विकारताना कलावंताला आणि त्याच्या आयुष्यातील व्यक्तींना चिरंतन वेदनेच्या दाहास सामोरे जावे लागते. मनोहर हा चित्रकार आपल्या कलेला समर्पित असणारा कलावंत. चित्रांच्या व चित्रकलेच्या माध्यमातून नाविन्याचा शोध घेणे हे त्याचे वैशिष्ट्य. अनिता त्याची सहचारिणी, सर्वसामान्य स्त्री लग्न झाल्यावर नवऱ्याकडून ज्या अपेक्षा ठेवत असते त्या पूर्ण न झालेली... पण मनोहरवरती निस्सीम प्रेम करणारी. अनिताची चित्रकलेमधील समज खूप कमी आहे. हे तिचे अपूर्णत्व मनोहरला सलत असते. माधवी मनोहरची मैत्रीण, अनिता मधील अपूर्णत्व तो माधवी मध्ये शोधण्याचा प्रयत्न करतो. माधवी प्रतिथयश लेखिका आणि मनोहरच्या कलाप्रवासाची सोबती. मनोहरच्या कलंदरपणाची, बेदरकार जगण्याची आणि त्याच्या कलाविश्वातील जगण्याशी एकरूप झालेली. माधवीने सर्वार्थाने मनोहर ला स्वीकारलेले असते. मनोहरला कॅन्सर झालेला आहे. तो कुठल्याही उपचाराला प्रतिसाद देत नाही, हॉस्पिटलमध्ये मनोहर मृत्यशय्येवर असतांना अनिता आणि माधवी यांच्यातील वैचारिक आणि तात्विक मंथन म्हणजे पूर्णविराम... !





सादरकर्ते : खापरखेडा औष्णिक विद्युत केंद्र । लेखक : श्री. इरफान मुजावर । दिग्दर्शक : श्री. महेंद्र राऊत । निर्मिती प्रमुख : श्री. विजय राठोड, मुख्य अभियंता । निर्मिती प्रमुख : श्री. नारायण राठोड, श्री. सुदिप राणे, श्री. विराज चौधरी, श्री. प्रविण रोकडे (उप मुख्य अभियंते) । सूत्रधार : श्री. आनंद वाघमारे । संघ व्यवस्थापक : श्री. महेंद्र राऊत । नेपथ्य : श्री. आशिष नाचने, श्री. शशिकांत पाटील । नेपथ्य सहाय्य : श्री. नरेंद्र चंदनकर, श्री. बाळु ओगटे, श्री. पांडुरंग नखाते, श्री. भागेश्वर मांढरे । प्रकाश योजना : श्री. शाम चांदुरकर, श्री. मारोती भोज, श्री. रितेश लांजेवार । संगीत : श्री. राहुल बागडे, श्री. भूषण दाणी, श्री. शंकर घोरसे । रंगभूषा / वेशभूषा : आकांक्षा केळवदे, सौ. प्रिया खोके, सौ. स्वाती चौधरी । कलाकार : श्री. सुरज खोके, सौ. प्राची दाणी, रुपाली बोबांटे, श्री. प्रसाद चौधरी ।

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित









# रसिक प्रेक्षक





## महानिर्मिती रंगकर्मींची खिलाडूवृत्ती

स्पर्धेत आपले नाटक प्रथम यावे ही प्रत्येकाची अपेक्षा स्वाभाविक असली तरी महानिर्मिती नाट्यस्पर्धेत आपले नाटक झाल्यावर इतर नाटकाच्या रंगकर्मींना प्रत्यक्ष–अप्रत्यक्ष सहकार्य, मदत करून त्यांचेही नाटक कसे दर्जेदार होईल यासाठी नेपथ्य, प्रकाश, संगीत याबाबतीत सर्वतोपरी सहकार्य करताना अनेक रंगकर्मी दिसले त्यांच्या या खिलाडूवृत्तीला, नाटकाविषयी असलेल्या आत्मीयतेला, सहृदयी वृत्तीला निश्चितच सलाम केला पाहिजे.

## ज्येष्ठ रंगकर्मींची / सेवानिवृत्तींची लक्षणीय उपस्थिती

सौ. शीला बिडकर
श्री. शंखपाळे शंकर
सौ. सीमा शंखपाळे
श्री. कमल वाघधरे
श्री. दिवाकर देशमुख

श्री. भास्कर शेगोकर
श्री. प्रवीण तिर्थगिरीकर
श्री. अनिल अष्टीकर
श्री. संजय अस्वले
श्री. भगवंत भगत

श्री. चंद्रकांत सोरटे
श्री. चंद्रकांत सपकाळे
श्री. शंकर घोरसे
श्री. ज्ञानेश्वर लांजेवार
श्री. सुरेश माळी

श्री. नवघरे
श्री. गणोजे
श्री. सुधाकर पाटील
श्री. प्रकाश देशपांडे
सौ. माधुरी गणोजे

श्री. प्रकाश देवा
श्री. अनिल जोशी
सौ. अवंतिका शेगोकर
सौ. अनिता जोशी
सौ वर्षा कोट्टावार

श्री. चंद्रकांत जाडकर
श्री. मिलिंद रहाटगावकर
श्री. अनिल सुर्जीकर
सौ. अंजली सुर्जीकर
श्री. शिरीष घारे
सौ. अनिता घारे

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# पारितोषिक वितरण समारंभ

**दर्जेदार नाट्यकृती, भरगच्च सभागृह, प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादासह नाट्यस्पर्धेची स्मरणीय सांगता नाट्यस्पर्धेत खापरखेडा वीज केंद्राचे "पूर्णविराम" प्रथम, कोराडी केंद्राचे "गावभाग" द्वितीय तर नाशिक केंद्राचे "दोन स्पेशल" तृतीय**

## नाट्यस्पर्धेत नवनवीन रंगकर्मी यावेत आणि ज्येष्ठ रंगकर्मींना मोठा मंच उपलब्ध व्हावा




नाट्यस्पर्धेत नवनवीन लोक आले पाहिजेत आणि प्रतिभासंपन्न रंगकर्मींना मोठा मंच उपलब्ध व्हावा यासाठी महानिर्मिती प्रयत्नरत आहे. नाट्यस्पर्धेतून सांघिक भावना वृद्धिंगत करून त्याचा महानिर्मितीच्या शाश्वत विकासासाठी उपयोग व्हावा, असे मत महानिर्मितीचे संचालक (संचलन) मा.श्री. संजय मारुडकर यांनी व्यक्त केले. ते महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात सायंटीफिक सभागृहात अध्यक्षस्थानाहून बोलत होते.

प्रत्येक वीज केंद्राने निवडलेल्या नाटकांची नांवे आणि त्या-त्या वीज केंद्राची संस्कृती तथा कार्यपद्धतीची उत्कृष्ट सांगड घालत श्री. संजय मारुडकर यांनी उपस्थितांना आश्चर्यचकित केले. महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विक्रमी वीज उत्पादन केल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

## नाट्यस्पर्धा समाजमाध्यमांवर उपलब्ध व्हावी




श्री. पंकज सपाटे म्हणाले की, "प्रत्येक वीज केंद्राने आपल्या वर्धापन दिनाला नाट्य प्रयोग सादर केल्यास वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांना आपली नाट्यकला दाखवता येईल. तसेच यु-ट्यूब सारख्या समाज माध्यमांवर नाट्यस्पर्धा लाईव्ह दाखविल्यास महानिर्मितीच्या जास्तीत जास्त अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांना ही नाटके सहज पाहता येतील".

## रंगकर्मींनी नवनवीन संधी शोधाव्यात




श्री. विवेक रोकडे यांनी आकस्मिक निधन पावलेल्या स्व. अभिजित कुळकर्णी आणि नाटकाची तुलनात्मक भावना व्यक्त करताना सांगितले की, "आयुष्य हे एक नाटक आहे, आपण दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या भूमिका करत असतो". त्यांनी आनंद चित्रपटातील सुप्रसिद्ध डायलॉग, "बाबू मोशाय, जिंदगी और मौत उपरवाले के हाथ में है, उसे ना तो आप बदल सकते है ना मैं... हम तो सब इस रंगमंच कि कठपुतलियाँ है जिनकी दोर उपरवाले कि उंगलियो में बंधी है."

## रंगीत तालीमची संधी व प्रथम भूमिका करणाऱ्यांना सन्मानित करा




ज्येष्ठ रंगकर्मी श्री. संजय पेंडसे यांनी दोन महत्वपूर्ण सूचना केल्या, त्यात महानिर्मितीच्या प्रतिभासंपन्न रंगकर्मींना प्रयोगाच्या आदल्या दिवशी नाट्यगृहात रंगीत तालीम व्यवस्था करून दिल्यास तांत्रिक चुका कमी होण्यास मोठा हातभार लागेल आणि जे कर्मचारी प्रथमच रंगमंचावर आपली कला सादर करणार आहेत त्यांना विशेष गुण अथवा सन्मान देण्यात यावा जेणेकरून नाटकात सहभाग वाढेल.

कला आनंद देते, आपली कला लोकांपर्यंत पोहोचविणे सोपे नाही त्याकरिता तपश्चर्या करावी लागते. भीमसेन जोशी, लता मंगेशकर यांनी ध्येय गाठण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाचे त्यांनी उदाहरण दिले. जी गोष्ट शाळेत शिकवली जात नाही ती नाटकात शिकता येते. त्यांनी महानिर्मिती नाटकांच्या नावांची अभिनव स्वरूपात गुंफण करून उपस्थित रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

ही नाट्यस्पर्धा नसून कौटुंबिक सोहळा आहे, एकमेकांना भेटण्याची हितगुज करण्याची अभिव्यक्ती सादर करण्याची संधी मिळाली असल्याचे रंगकर्मी श्री. महेंद्र राऊत यांनी सांगितले.



प्रास्ताविक तथा अहवाल वाचन उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम यांनी केले.




## जाणीवा प्रगल्भित करणारी ही नाट्यस्पर्धा




परीक्षक श्री. संजय हळदीकर म्हणाले की, महानिर्मितीचे रंगकर्मी पंढरपूर वारकऱ्यांप्रमाणे भक्तिभावाने नाटक करतात, नाटकाची जाण आहे. जाणीवा प्रगल्भित करणारी नाट्यस्पर्धा असून महानिर्मितीमध्ये स्त्री दिग्दर्शिका आहे ही अभिमानाची बाब आहे. या नाटकांना सौंदर्य, भावनिक, बौद्धिक मुल्ये असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

पारितोषिक वितरण समारंभाचे सूत्रसंचलन श्री. रवी पवार, श्री. जयंत भातकुलकर यांनी केले तर आभार प्रदर्शन श्री. मयुर मेंढेकर यांनी केले.





महानिर्मिती

# पारितोषिक वितरण समारंभ

समारोपीय समारंभात विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी श्री. संजय पेंडसे, परीक्षक श्री. संजय हळदीकर, श्री. बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले तर महानिर्मितीचे कार्यकारी संचालक (सं व सु. – २) श्री. पंकज सपाटे, श्री. विवेक रोकडे, मुख्य अभियंते श्री. किशोर राऊत, श्री. विजय राठोड, श्री. गिरीश कुमरवार, श्री. विलास मोटघरे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. मुकेश मेश्राम प्रामुख्याने रंगमंचावर उपस्थित होते.

याप्रसंगी सेवानिवृत्त रंगकर्मींचा यथोचित सत्कार करण्यात आला त्यात श्री. अनिल शिंदे (उरण), श्री. प्रदीप साळे (भुसावळ), श्री. अरविंद वानखेडे (पारस), श्री. राहुल बागडे (खापरखेडा), श्री. दिवाकर देशमुख (कोराडी), श्री. मुकुंद भोकरधनकर (कोराडी) यांचा समावेश होता. विजेत्या रंगकर्मींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. रंगमंचावर पहिले पाऊल म्हणून बालकलाकारांचा विशेष सन्मान करण्यात आला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रारंभी प्रभारी मुख्य अभियंता अभिजित कुळकर्णी यांच्या आकस्मिक निधनाबाबत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महानिर्मिती जनसंपर्क विभागाकडून "महानिर्मिती यशोगाथा" ही चित्रफित दाखविण्यात आली. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले.

महानिर्मितीच्या ह्या नाट्यस्पर्धेत सुमारे ३०० रंगकर्मींनी सहभाग नोंदविला. एकूण ८ नाट्यप्रयोग प्रस्तुत झाले त्यात कोराडी (गावभाग), परळी (संशयात्मा विनश्यती), भुसावळ (एक्सपायरी डेट), नाशिक (दोन स्पेशल), उरण (भांडा सौख्यभरे), खापरखेडा (पूर्णविराम), चंद्रपूर (यक्षप्रश्न) व मुंबई (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट) इत्यादींचा समावेश होता.

समारंभाला महानिर्मितीचे उप मुख्य अभियंते सर्वश्री. प्रवीण रोकडे, शैलेन्द्र कासुलकर, अधीक्षक अभियंते सचिन भागेवार, नितीन रोकडे, गीतांजली पारखी, किरण नानवटकर, सारिका सोनटक्के, सचिन देगवेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, समन्वयक प्रवीण बुटे, विविध नाट्य संघांचे संघ व्यवस्थापक, कल्याण अधिकारी, सहाय्यक कल्याण अधिकारी, नाट्यस्पर्धा आयोजन समिती, संघटना प्रतिनिधी, कलावंत/रंगकर्मी तसेच कोराडी–खापरखेडा– नागपुरातील महानिर्मितीचे अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय, सेवानिवृत्त अधिकारी–कर्मचारी/रंगकर्मी व शहरातील नाट्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा २०२४ - निकाल पत्रक

### नाट्य निर्मिती

प्रथम - पूर्णविराम (खापरखेडा)
द्वितीय - गावभाग (कोराडी)
तृतीय - दोन स्पेशल (नाशिक)
उत्तेजनार्थ - एक्सपायरी डेट (भुसावळ)

### दिग्दर्शन

प्रथम - महेंद्र राऊत (पूर्णविराम)
द्वितीय - मिलिंद चन्ने (गावभाग)
तृतीय - दोन स्पेशल (शशिकांत पवार)

सर्वोत्कृष्ट लेखकः मिलिंद चन्ने, नाटक-गावभाग

### अभिनय पुरुष

प्रथम - महेश होनमाने, भूमिका-नाना (एक्सपायरी डेट)
द्वितीय - सुरेश खोके, भूमिका-मनोहर (पूर्णविराम)
तृतीय - संजय सातफळे, भूमिका-बापू (गावभाग)

### उत्तेजनार्थ पुरुष

शुभम गुडा, भूमिका-रानु (एक्सपायरी डेट)
देवेंद्र जोशी, भूमिका राजवाडे (भांडा सौख्यभरे)
निलेश राऊत, भूमिका-मिलिंद भागवत (दोन स्पेशल)
ज्ञानदीप कोकाटे, भूमिका-दिनकर (यक्षप्रश्न)
सचिन मोडकवार, भूमिका सचिन (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट)

### अभिनय स्त्री

प्रथम - प्राची दाणी, भूमिका-अनिता, (पूर्णविराम)
द्वितीय - सायली देठे, भूमिका-दीपाली, (यक्षप्रश्न)
तृतीय - शृजल हिरे, भूमिका-स्वप्ना जोग, (दोन स्पेशल)

### उत्तेजनार्थ स्त्री

वैष्णवी वंजाळकर, भूमिका-लक्ष्मी(गावभाग)
प्रियंका पाटील, भूमिका-सौ राजवाडे(भांडा सौख्यभरे)
ऐश्वर्या खोसे, भूमिका-म्हातारी(एक्सपायरी डेट)
अनिता गायकवाड, भूमिका-आजी (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट)

लक्षवेधी पुरुष : पंकज घाटोळे, भूमिका-मास्तर(गावभाग)
लक्षवेधी स्त्री : सोनाली डोंगरे, भूमिका-बाई (संशयात्मा विनश्यती)

### नेपथ्य

प्रथम - गावभाग (कोराडी)
द्वितीय - दोन स्पेशल (नाशिक)
तृतीय - पूर्णविराम (खापरखेडा)

### प्रकाशयोजना

प्रथम - गावभाग (कोराडी)
द्वितीय - दोन स्पेशल(नाशिक)
तृतीय - पूर्णविराम (खापरखेडा)

### संगीत

प्रथम - दोन स्पेशल (नाशिक)
द्वितीय - संशयात्मा विनश्यती (परळी)
तृतीय - पूर्णविराम (खापरखेडा)

### रंगभूषा व वेशभूषा

प्रथम - एक्सपायरी डेट (भुसावळ)
द्वितीय - संशयात्मा विनश्यती(परळी)
तृतीय - गावभाग (कोराडी)

### बाल कलाकार

स्वर्णीका बाकडे - भूमिका चिंगी (गावभाग), गटमाने - भूमिका लहान बापू (गावभाग), विभोर चोरसे - भुमिका लहान माऊली (गावभाग), रुही सरोदे - भूमिका रुही (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट)

महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा २०२४
## पारितोषिक वितरण समारंभ - क्षणचित्रे





### मान्यवर अतिथींचा सन्मान करताना












### मान्यवर परीक्षकांचा सन्मान करताना

### महानिर्मितीचा अभिमान
### "महिला दिग्दर्शिका"



सौ. ज्योती हंकारे
दिग्दर्शिका
(तिचे संदर्भ नसलेली गोष्ट), मुंबई



सौ. सोनाली डोंगरे
दिग्दर्शिका
(संशयात्मा विनश्यती), परळी



सर्वोत्कृष्ट लेखक पुरस्कार श्री. मिलिंद चन्ने यांना जाहीर झाल्यावर त्यांनी सदर पुरस्कार स्वीकारण्याचा मान आईला दिला.

महानिर्मिती

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा २०२४
## पारितोषिक वितरण समारंभ - क्षणचित्रे







सेवानिवृत्त रंगकर्मींना सन्मानित करताना






बाल कलाकारांना सन्मानित करताना













महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा २०२४
# पारितोषिक वितरण समारंभ - क्षणचित्रे


















महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा २०२४
# पारितोषिक वितरण समारंभ - क्षणचित्रे










प्रथम - पूर्णविराम (खापरखेडा)



द्वितीय - गावभाग (कोराडी)



तृतीय - दोन स्पेशल (नाशिक)

## नाट्यस्पर्धेत नवनवीन रंगकर्मी यावेत आणि ज्येष्ठ रंगकर्मींना मोठा मंच उपलब्ध व्हावा-संजय मारुडकर

# महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेत खापरखेडा वीज केंद्राचे 'पूर्णविराम' प्रथम

- कोराडी केंद्राचे 'गावभाग' द्वितीय तर नाशिक केंद्राचे 'दोन स्पेशल' तृतीय
- जाणीवा प्रगल्भित करणारी नाट्यस्पर्धा- संजय हल्दिकर
- दर्जेदार नाट्यकृती, भरगच्च सभागृह, प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादासह नाट्यस्पर्धेची स्मरणीय सांगता





### महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा २०२४

### निकाल पत्रक

---

**लोकमत**

महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचे निकाल जाहीर

# खापरखेडा वीज केंद्राचे 'पूर्णविराम' प्रथम



लोकमत न्यूज नेटवर्क

नागपूर : महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचे अंतिम निकाल रविवारी जाहीर करण्यात आले. खापरखेडा वीज केंद्रातर्फे सादर व महेंद्र राऊत दिग्दर्शित 'पूर्णविराम' या नाटकाने स्पर्धेत बाजी मारली. सर्वोत्तम नाटक व दिग्दर्शनाचा प्रथम पुरस्कार या नाटकाने पटकावला. कोराडी वीज केंद्रातर्फे सादरीत 'गावभाग' या नाटकाने द्वितीय क्रमांक पटकावला. नाटकाच्या लेखनासाठी मिलिंद चन्ने यांना लेखनाचा प्रथम पुरस्कार मिळाला.

२ ते ६ जुलैदरम्यान सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर येथे नाट्यस्पर्धेचे आयोजन करण्यात आले. महानिर्मितीच्या नाट्यस्पर्धेत सुमारे ३०० रंगकर्मींनी सहभाग नोंदविला. एकूण ८ नाट्यप्रयोग प्रस्तुत झाले त्यात कोराडी (गावभाग), परळी (संश यात्मा विनश्यती), भुसावळ (एक्सपायरी डेट), नाशिक (दोन स्पेशल), उरण (भांडा सौख्यभरे), खापरखेडा (पूर्णविराम), चंद्रपूर (यक्षप्रश्न) व मुंबई (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट) आदींचा समावेश होता. दर्जेदार नाट्यकृती, भरगच्च सभागृह, प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादासह नाट्यस्पर्धेची स्मरणीय सांगता झाली.

नाट्यस्पर्धेच्या समारोपाला महानिर्मितीचे संचालक(संचलन) संजय मारुडकर, ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे, परीक्षक संजय हल्दीकर, बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले तर महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, विवेक रोकडे, मुख्य अभियंते किशोर राऊत, विजय राठोड, गिरीश कुमरवार, विलास मोटघरे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते. यावेळी महानिर्मितीचे उपमुख्य अभियंते प्रवीण रोकडे, शैलेन्द्र कासुलकर, अधीक्षक अभियंते सचिन भागेवार, नितीन रोकडे, गीतांजली पारखी, किरण नानवटकर, सारिका सोनटक्के, सचिन देगवेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, समन्वयक प्रवीण बुटे आदींचाही सहभाग होता. संचालन रवी पवार व जयंत भातकुलकर यांनी केले. मयूर मेंढेकर यांनी आभार मानले.

**नाट्य निर्मिती**

प्रथम- पूर्णविराम (खापरखेडा)
द्वितीय- गावभाग (कोराडी)
तृतीय- दोन स्पेशल (नाशिक)
उत्तेजनार्थ -एक्सपायरी डेट (भुसावळ)

**दिग्दर्शन**

प्रथम- महेंद्र राऊत (पूर्णविराम)
द्वितीय-मिलिंद चन्ने (गावभाग)
तृतीय- दोन स्पेशल (शशिकांत पवार)
सर्वोत्कृष्ट लेखक
मिलिंद चन्ने -गावभाग

**अभिनय पुरुष**

प्रथम- महेश होनमाने (एक्सपायरी डेट)
द्वितीय- सुरेश खोके (पूर्णविराम)
तृतीय- संजय सातफळे (गावभाग)

**अभिनय स्त्री**

प्रथम- प्राची दाणी (पूर्णविराम)
द्वितीय- सायली देठे (यक्षप्रश्न)
तृतीय- श्रृजल हिरे (दोन स्पेशल)

---

शब्दांना सत्याची धार

**प्रहार**

## महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेत खापरखेडा वीज केंद्राचे 'पूर्णविराम' प्रथम

◆ नाशिक (प्रतिनिधी) :

नाट्यस्पर्धेत नवनवीन लोक आले पाहिजेत आणि प्रतिभासंपन्न रंगकर्मींना मोठा मंच उपलब्ध व्हावा यासाठी महानिर्मिती प्रयत्नरत आहे. नाट्यस्पर्धेतून सांघिक भावना वृद्धिंगत करून त्याचा महानिर्मितीच्या शाश्वत विकासासाठी उपयोग व्हावा असे मत महानिर्मितीचे संचालक(संचलन) संजय मारुडकर यांनी व्यक्त केले. ते महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात सायंटीफिक सभागृहात अध्यक्षस्थानाहून बोलत होते.

समारोपीय समारंभात विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे परीक्षक संजय हल्दीकर, बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले तर महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे,विवेक रोकडे, मुख्य अभियंते किशोर राऊत, विजय राठोड, गिरीश कुमरवार, विलास मोटघरे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम प्रामुख्याने रंगमंचावर उपस्थित होते.

प्रत्येक वीज केंद्राने निवडलेल्या नाटकांची नांवे आणि त्या-त्या वीज केंद्राची संस्कृती तथा कार्यपद्धतीची उत्कृष्ट सांगड घालत संजय मारुडकर यांनी उपस्थितांना आश्चर्यचकित केले. महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विक्रमी वीज उत्पादन केल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले.

रंगकर्मी संजय पेंडसे यांनी दोन महत्वपूर्ण सूचना केल्या त्यात महानिर्मितीच्या प्रतिभासंपन्न रंगकर्मींना प्रयोगाच्या आदल्या दिवशी नाट्यगृहात रंगीत तालीम व्यवस्था करून दिल्यास तांत्रिक चुका कमी होण्यास मोठा हातभार लागेल आणि जे कर्मचारी प्रथमच रंगमंचावर आपली कला सादर करणार आहेत त्यांना विशेष गुण अथवा सन्मान देण्यात यावा जेणेकरून नाटकात सहभाग वाढेल. कला आनंद देते, आपली कला लोकांपर्यंत पोहोचविणे सोपे नाही त्याकरिता तपश्चर्या करावी लागते. भीमसेन जोशी, लता मंगेशकर यांनी ध्येय गाठण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाचे त्यांनी उदाहरण दिले. जी गोष्ट शाळेत शिकवली जात नाही ती नाटकात शिकता येते. त्यांनी महानिर्मिती नाटकांच्या नावांची अभिनव स्वरूपात गुंफण करून उपस्थित रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली.

पंकज सपाटे म्हणाले प्रत्येक वीज केंद्राने आपल्या वर्धापन



दिनाला नाट्य प्रयोग सादर केल्यास वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांना आपली नाट्यकला दाखवता येईल. तसेच यु-ट्यूब सारख्या समाज माध्यमांवर नाट्यस्पर्धा लाइव दाखविल्यास महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांना ही नाटके सहज पाहता येतील.

विवेक रोकडे यांनी आकस्मिक निधन पावलेल्या अभिजित कुळकर्णी आणि नाटकाची तुलना करताना आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले कि, आयुष्य हे एक नाटक आहे, आपण दैनंदिन जीवनात वेगवेगळ्या भूमिका करत असतो. त्यांनी आनंद चित्रपटातील सुप्रसिद्ध डायलॉग "बाबूमोशाय, जिंदगी और मौत उपरवाले के हाथ मे है, उसे ना तो आप बदल सकते है ना मैं... हम तो सब इस रंगमंच कि कठपुतलीया है जिनकी दोर उपरवाले कि उंगलीयो में बंधी है."

**दर्जेदार नाट्यकृती, भरगच्च सभागृह, प्रेक्षकांच्या प्रचंड प्रतिसादासह नाट्यस्पर्धेची स्मरणीय सांगता**

परीक्षक संजय हळदीकर म्हणाले की, महानिर्मितीचे रंगकर्मी पंढरपूर वारकऱ्यांप्रमाणे भक्तिभावाने नाटक करतात, नाटकाची जाण आहे. जाणीवा प्रगल्भित करणारी नाट्यस्पर्धा असून महानिर्मितीमध्ये स्त्री दिग्दर्शिका आहे ही अभिमानाची बाब आहे. या नाटकांना सौंदर्य, भावनिक, बौद्धिक मुल्ये असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले. ही नाट्यस्पर्धा नसून कौटुंबिक सोहळा आहे, एकमेकांना भेटण्याची हितगुज करण्याची अभिव्यक्ती सादर करण्याची संधी मिळाली असल्याचे रंगकर्मी महेंद्र राऊत यांनी सांगितले.

याप्रसंगी, सेवानिवृत्त रंगकर्मींचा यथोचित सत्कार करण्यात आला त्यात अनिल शिंदे (उरण), प्रदीप साळे (भुसावळ), अरविंद वानखेडे (पारस), राहुल बागडे (खापरखेडा), दिवाकर देशमुख (कोराडी), मुकुंद भोकरधनकर (कोराडी) यांचा समावेश होता. विजेत्या रंगकर्मींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. रंगमंचावर पहिले पाऊल म्हणून बालकलाकारांचा विशेष सन्मान करण्यात आला. विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले.

प्रारंभी प्रभारी मुख्य अभियंता अभिजित कुळकर्णी यांच्या आकस्मिक निधनाबाबत त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. महानिर्मिती जनसंपर्क विभागाकडून "महानिर्मिती यशोगाथा" ही चित्रफित दाखविण्यात आली. प्रास्तविक तथा अहवाल वाचन उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम यांनी केले तर सूत्र संचलन रवी पवार, जयंत भातकुलकर व आभार प्रदर्शन मयूर मेंढेकर यांनी केले. महानिर्मितीचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक यांच्या संदेशाचे वाचन करण्यात आले.

महानिर्मितीच्या ह्या नाट्यस्पर्धेत सुमारे ३०० रंगकर्मींनी सहभाग नोंदविला. एकूण ८ नाट्यप्रयोग प्रस्तुत झाले त्यात कोराडी (गावभाग), परळी (संश यात्मा विनश्यती), भुसावळ (एक्सपायरी डेट), नाशिक (दोन स्पेशल), उरण (भांडा सौख्यभरे), खापरखेडा (पूर्णविराम), चंद्रपूर (यक्षप्रश्न) व मुंबई (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट) इत्यादींचा समावेश होता.

समारंभाला महानिर्मितीचे उप मुख्य अभियंते प्रवीण रोकडे, शैलेन्द्र कासुलकर, अधीक्षक अभियंते सचिन भागेवार, नितीन रोकडे, गीतांजली पारखी, किरण नानवटकर, सारिका सोनटक्के, सचिन देगवेकर, मुख्य जनसंपर्क अधिकारी यशवंत मोहिते, समन्वयक प्रवीण बुटे, विविध नाट्य संघांचे संघ व्यवस्थापक, कल्याण अधिकारी, सहाय्यक कल्याण अधिकारी, नाट्यस्पर्धा आयोजन समिती, संघटना प्रतिनिधी, कलावंत/ रंगकर्मी तसेच कोराडी-खापरखेडा-नागपुरातील महानिर्मितीचे अधिकारी, कर्मचारी, कुटुंबीय, सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचारी/रंगकर्मी व शहरातील नाट्यप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

**लोकमंथन**

## महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्यस्पर्धेत खापरखेडा वीज केंद्राचे पूर्णविराम प्रथम

लोकमंथन । प्रतिनिधी



नाशिक । नाट्यस्पर्धेत नवनवीन लोक आले पाहिजेत आणि प्रतिभासंपन्न रंगकर्मींना मोठा मंच उपलब्ध व्हावा यासाठी महानिर्मिती प्रयत्नरत आहे. नाट्यस्पर्धेतून सांघिक भावना वृद्धिंगत करून त्याचा महानिर्मितीच्या शाश्वत विकासासाठी उपयोग व्हावा असे मत महानिर्मितीचे संचालक(संचलन) संजय मारुडकर यांनी व्यक्त केले. ते महानिर्मितीच्या राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात सायंटीफिक सभागृहात अध्यक्षस्थानाहून बोलत होते. समारोपीय समारंभात विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे परीक्षक संजय हल्दीकर, बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले तर महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे,विवेक रोकडे, मुख्य अभियंते किशोर राऊत, विजय राठोड, गिरीश कुमरवार, विलास मोटघरे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम प्रामुख्याने रंगमंचावर उपस्थित होते. प्रत्येक वीज केंद्राने निवडलेल्या नाटकांची नांवे आणि त्या-त्या वीज केंद्राची संस्कृती तथा कार्यपद्धतीची उत्कृष्ट सांगड घालत संजय मारुडकर यांनी उपस्थितांना आश्चर्यचकित केले. महानिर्मिती अधिकारी-कर्मचाऱ्यांनी विक्रमी वीज उत्पादन केल्याचे त्यांनी याप्रसंगी सांगितले. ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे यांनी दोन महत्वपूर्ण सूचना केल्या त्यात महानिर्मितीच्या प्रतिभासंपन्न रंगकर्मींना प्रयोगाच्या आदल्या दिवशी नाट्यगृहात रंगीत तालीम व्यवस्था करून दिल्यास तांत्रिक चुका कमी होण्यास मोठा हातभार लागेल आणि जे कर्मचारी प्रथमच रंगमंचावर आपली कला सादर करणार आहेत त्यांना विशेष गुण अथवा सन्मान देण्यात यावा जेणेकरून नाटकात सहभाग वाढेल. कला आनंद देते, आपली कला लोकांपर्यंत पोहोचविणे सोपे नाही त्याकरिता तपश्चर्या करावी लागते. भीमसेन जोशी, लता मंगेशकर यांनी ध्येय गाठण्यासाठी घेतलेल्या परिश्रमाचे त्यांनी उदाहरण दिले. जी गोष्ट शाळेत शिकवली जात नाही ती नाटकात शिकता येते. त्यांनी महानिर्मिती नाटकांच्या नावांची अभिनव स्वरूपात गुंफण करून उपस्थित रसिक प्रेक्षकांची वाहवा मिळवली. पंकज सपाटे म्हणाले प्रत्येक वीज केंद्राने आपल्या वर्धापन दिनाला नाट्य प्रयोग सादर केल्यास वीज केंद्रातील अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांना आपली नाट्यकला दाखवता येईल. तसेच यु-ट्यूब सारख्या समाज माध्यमांवर नाट्यस्पर्धा लाइव दाखविल्यास महानिर्मितीच्या अधिकारी-कर्मचारी आणि कुटुंबियांना ही नाटके सहज पाहता येतील.

---

**माध्यमांच्या नजरेतून**

---

दर्जेदार नाट्यकृती ● भरगच्च सभागृह, प्रचंड प्रतिसादात नाट्यस्पर्धेची सांगता

## महानिर्मितीच्या नाट्यस्पर्धेत 'पूर्णविराम' प्रथम

नागपूर. नाट्यस्पर्धेत नवनवीन कलाकार यावेत, प्रतिभासंपन्न रंगकर्मींना मोठा रंगमंच उपलब्ध व्हावा यासाठी महानिर्मिती प्रयत्नरत आहे. नाट्यस्पर्धेतून सांघिक भावना वृद्धिंगत करून त्याचा महानिर्मितीच्या शाश्वत विकासासाठी उपयोग व्हावा असे मत महानिर्मितीचे संचालक (संचलन) संजय मारुडकर यांनी व्यक्त केले. ते महानिर्मितीच्या नाट्यस्पर्धेच्या समारोपीय कार्यक्रमात बोलत होते. याप्रसंगी विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे, परीक्षक संजय हल्दीकर, बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले तर महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, विवेक रोकडे, मुख्य अभियंते किशोर राऊत, विजय राठोड, गिरीश कुमरवार, विलास मोटघरे, उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम प्रामुख्याने उपस्थित होते.

नाटकांना सौंदर्य, भावनिक, बौद्धिक मुल्ये असल्याचे जाणवले. हा कौटुंबिक सोहळा आहे, अभिव्यक्ती सादर करण्याची संधी असल्याचे रंगकर्मी महेंद्र राऊत यांनी



सांगितले. या प्रसंगी, अनिल शिंदे, उरण, प्रदीप साळे, भुसावळ, अरविंद वानखेडे, पारस, राहुल बागडे, खापरखेडा, दिवाकर देशमुख, कोराडी, मुकुंद भोकरधनकर, कोराडी या सेवानिवृत्त रंगकर्मींचा सत्कार करण्यात आला. तसेच विजेत्या रंगकर्मींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. रंगमंचावर

**300 रंगकर्मींचा सहभाग**

या नाट्यस्पर्धेत सुमारे 300 रंगकर्मींनी सहभाग नोंदविला. एकूण ८ नाट्यप्रयोगात कोराडी केंद्राचे गावभाग, परळीचे संशयात्मा विनश्यती, भुसावळचे एक्सपायरी डेट, नाशिकचे दोन स्पेशल, उरणचे भांडा सौख्यभरे, खापरखेडाचे पूर्णविराम, चंद्रपूरचे यक्षप्रश्न व मुंबईचे तिचे संदर्भ नसलेली गोष्ट या नाटकांचा समावेश होता.

पहिले पाऊल म्हणून बालकलाकारांचा विशेष सन्मान करण्यात आला. प्रारंभी प्रभारी मुख्य अभियंता अभिजित कुळकर्णी यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. "महानिर्मिती यशोगाथा" ही चित्रफीत दाखविण्यात आली. प्रास्ताविक मुकेश मेश्राम यांनी केले. संचालन रवी पवार व जयंत भातकुलकर यांनी केले. आभार प्रदर्शन मयूर मेंढेकर यांनी केले.

---

## Mahagenco theatre contest ends with compelling plays on feminism and art

Chaitanya.Deshpande@timesofindia.com

Nagpur: The MahaGenco Inter-Power Station Theatre Competition concluded on Saturday with a powerful performance by the Khaparkheda Thermal Power Station near Nagpur. Their play 'Purna Viram' (Full Stop), was the final act in a competition that saw nine teams from across Maharashtra showcase their talents.

The theatre competition, held at Scientific Society Hall in Laxmi Nagar, witnessed a variety of themes explored throughout the week. On the concluding day, the Mahagenco Headquarters team from Mumbai presented a thought-provoking Marathi play titled 'Tiche Sandarbh Nasleli Gosht.

This play tackled the challenges of feminism, following a woman's journey as she strives to break free from societal expectations and forge her own path. However, the play also explores the sacrifices she makes in pursuit of her goals.

Madhu Kumre



Play 'Tiche Sandarbh Nasleli Gosht' was presented by MahaGenco HQs, Mumbai, at Scientific Hall, Laxmi Nagar, on Saturday

Written by Rahul Shende with a concept by Rajan Khan and directed by Jyoti Hankare, the play resonated with the audience.

The evening session saw Khaparkheda station present 'Purna Viram', a poignant story about an artist named Manohar and the two women in his life.

Manohar, a dedicated painter constantly seeking innovation, struggles to connect with his wife Anita, whose desires for a traditional marriage remain unfulfilled. Meanwhile, Madhavi, a writer and Manohar's confidante, offers him a different kind of understanding. As Manohar grapples with cancer, the play delves into the complexities of love, loss, and artistic expression. Written by Irfan Muzawar and directed by Mahendra drama 'Purna Viram' leaves a lasting impression on the audience.

---

## खापरखेडा वीजकेंद्राचे 'पूर्णविराम' प्रथम

- महानिर्मिती नाट्य स्पर्धेत 'गावभाग' द्वितीय, तर 'दोन स्पेशल' तृतीय

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात २ ते ६ जुलैदरम्यान घेण्यात आलेल्या 'महानिर्मिती आंतर विद्युत केंद्र नाट्य स्पर्धा-२०२४'मध्ये निर्मिती व दिग्दर्शनासाठी खापरखेडा येथील 'पूर्णविराम' या नाटकाने बाजी मारत प्रथम पुरस्कार पटकावला. कोराडी संघाच्या 'गावभाग'ने द्वितीय, तर नाशिकच्या 'दोन स्पेशल' नाटकाने तृतीय पुरस्कार पटकावला. भुसावळ येथील 'एक्सपायरी डेट' या नाटकाला उत्तेजनार्थ पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

या स्पर्धेतील सर्वोत्कृष्ट लेखनाचे पारितोषिक 'गावभाग' नाटकासाठी मिलिंद चन्ने यांना प्रदान करण्यात आला. अभिनयासाठी पुरुष वर्गातील पारितोषिक महेश होनमाने, सुरेश खोके, संजय सातफळे यांनी पटकावला. तर स्त्रीवर्गात प्राची दाणी, सायली देठे व श्रृजल हिरे यांनी पुरस्कार पटकावले. स्पर्धेतील नेपथ्याचा प्रथम पुरस्कार 'गावभाग', द्वितीय 'दोन स्पेशल', तर तृतीय 'पूर्णविराम' या नाटकांना प्राप्त झाले. प्रकाश योजनेसाठी प्रथम 'गावभाग', द्वितीय 'दोन स्पेशल' आणि तृतीय 'पूर्णविराम', रंगभूषा व वेशभूषा प्रथम 'एक्सपायरी डेट', द्वितीय परळीतील 'संशयात्मा विनश्यती' व तृतीय 'गावभाग' ला देण्यात आले.

नाट्य स्पर्धेच्या पुरस्कार वितरण सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी महानिर्मितीचे संचालक संजय मारुडकर होते. प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे, परीक्षक संजय हळदीकर, बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, विवेक रोकडे, मुख्य अभियंते किशोर राऊत, विजय राठोड, गिरीश कुमरवार, विलास मोटघरे, उप-मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम उपस्थित होते. कार्यक्रमात ज्येष्ठ रंगकर्मींचा विशेष सत्कार करण्यात आला.

---

## नाट्य स्पर्धेत नवनवीन रंगकर्मींनी यावे : संजय मारूडकर

**महानिर्मिती आंतरविद्युतकेंद्र नाट्य स्पर्धेचा समारोप**

**खापरखेडा वीजकेंद्राच्या 'पूर्णविराम' नाटकाला प्रथम पुरस्कार**

पुण्य नगरी / प्रतिनिधी

नागपूर : नाट्य स्पर्धेतून सांघिक भावना वृद्धिंगत होते. त्यामुळे नाट्य स्पर्धेत नवनवीन लोक आले पाहिजेत, प्रतिभासंपन्न रंगकर्मींना मोठा मंच उपलब्ध व्हावा यासाठी महानिर्मिती प्रयत्नरत आहे, असे मत महानिर्मितीचे संचालक (संचलन) संजय मारूडकर यांनी व्यक्त केले. महानिर्मितीच्या महानिर्मिती आंतरविद्युतकेंद्र नाट्य स्पर्धेच्या लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात आयोजित समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षीय भाषणात ते बोलत होते. महानिर्मिती राज्यस्तरीय नाट्य स्पर्धेत खापरखेडा वीजकेंद्राचे 'पूर्णविराम' हे नाटक प्रथम पुरस्काराचे मानकरी ठरले.

कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून ज्येष्ठ रंगकर्मी संजय पेंडसे, परीक्षक संजय हल्दीकर, बाळकृष्ण तिडके, संगीता टिपले, महानिर्मितीचे कार्यकारी संचालक पंकज सपाटे, विवेक रोकडे, मुख्य अभियंते किशोर राऊत, विजय राठोड, गिरीश कुमरवार, विलास मोटघरे, उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी मुकेश मेश्राम उपस्थित होते. लक्ष्मीनगर येथील सायंटिफिक सभागृहात २ ते ६ जुलैदरम्यान झालेल्या महानिर्मिती आंतरविद्युतकेंद्र नाट्य स्पर्धेत ३०० रंगकर्मींनी एकूण आठ नाट्यप्रयोग सादर केले. समारोप कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सेवानिवृत्त रंगकर्मी अनिल शिंदे (उरण), प्रदीप साळे (भुसावळ), अरविंद वानखेडे (पारस), राहुल बागडे (खापरखेडा), दिवाकर देशमुख (कोराडी), मुकुंद भोकरधनकर (कोराडी) यांचा सत्कार करण्यात आला. बालकलावंतांसह विजेत्या रंगकर्मींना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्रभारी मुख्य अभियंता अभिजित कुळकर्णी यांच्या आकस्मिक निधनाबद्दल त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. याप्रसंगी महानिर्मिती जनसंपर्क



नाट्य : प्रथम पुरस्कार - 'पूर्णविराम' (खापरखेडा), द्वितीय - 'गावभाग' (कोराडी), तृतीय - 'दोन स्पेशल' (नाशिक), उत्तेजनार्थ - 'एक्सपायरी डेट' (भुसावळ). दिग्दर्शन : प्रथम पुरस्कार - महेंद्र राऊत (पूर्णविराम), द्वितीय - मिलिंद चन्ने (गावभाग), तृतीय - दोन स्पेशल (शशिकांत पवार). सर्वोत्कृष्ट लेखक : मिलिंद चन्ने (नाटक - गावभाग). अभिनय (पुरुष) : प्रथम पुरस्कार - महेश होनमाने (एक्सपायरी डेट), द्वितीय - सुरेश खोके (पूर्णविराम), तृतीय - संजय सातफळे (गावभाग), उत्तेजनार्थ - शुभम गुडा (एक्सपायरी डेट), देवेंद्र जोशी (भांडा सौख्यभरे), नीलेश राऊत (दोन स्पेशल), ज्ञानदीप कोकाटे (यक्षप्रश्न), सचिन मोडकवार (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट). (महिला) : प्रथम पुरस्कार - प्राची दाणी (पूर्णविराम), द्वितीय - सायली देठे (यक्षप्रश्न), तृतीय - श्रुजल हिरे (दोन स्पेशल). उत्तेजनार्थ - वैष्णवी वंजाळकर (गावभाग), प्रियंका पाटील (भांडा सौख्यभरे), ऐश्वर्या खोसे (एक्सपायरी डेट), अनिता गायकवाड (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट). लक्षवेधी (पुरुष) : पंकज घाटोळे (गावभाग). (महिला) : सोनाली डोंगरे (संशयात्मा विनश्यती). नेपथ्य व प्रकाशयोजना : प्रथम पुरस्कार - गावभाग (कोराडी), द्वितीय - दोन स्पेशल (नाशिक), तृतीय - पूर्णविराम (खापरखेडा). संगीत : प्रथम पुरस्कार - दोन स्पेशल (नाशिक), द्वितीय - संशयात्मा विनश्यती (परळी), तृतीय - पूर्णविराम (खापरखेडा). रंगभूषा व वेशभूषा : प्रथम पुरस्कार - एक्सपायरी डेट (भुसावळ), द्वितीय - संशयात्मा विनश्यती (परळी), तृतीय - गावभाग (कोराडी). बालकलाकार पुरस्काराचे मानकरी : स्वर्णिका बाकडे, गटमाने विभोर चोरसे (तिन्ही-गावभाग), रुही सरोदे (तिचे संदर्भ नसलेली गोष्ट).

विभागातर्फे 'महानिर्मिती यशोगाथा' ही चित्रफीत दाखविण्यात आली. प्रास्ताविक मुकेश मेश्राम तर संचालन रवी पवार व जयंत भातकुलकर यांनी केले. आभार मयूर मेंढेकर यांनी मानले.

---

नाट्यकला ● महानिर्मितीची राज्यस्तरीय नाट्यस्पर्धा, कलाकारांना प्रेक्षकांची दाद

## 'संशयात्मा विनश्यती'चे दर्जेदार सादरीकरण

नागपूर. सर्व सुखसोयी पायाशी असताना संशयरुपी भुंगा माणसाच्या सुखी आयुष्याला कसा पोखरत जातो, याच रहस्याचे कथन करणारी नाटिका. अज्ञानी, श्रद्धा विरहित आणि संशयी आत्म्याचा सर्वनाश होतो आणि इहलोकीचा प्रवासही त्याचा सुखाने होत नाही. हा भावार्थ भगवद्गीतेच्या चौथ्या अध्यायातील 40 व्या श्लोकाचा आहे. परळी औष्णिक विद्युत केंद्राने सादर केलेल्या डॉ. समीर मोने लिखित व सोनाली डोंगरे दिग्दर्शित 'संशयात्मा विनश्यती' नाटकाच्या दर्जेदार सादरीकरणाने हा भावार्थ तंतोतंत उपस्थित श्रोत्यांसमक्ष सादर करत अक्षरशः प्रेक्षकांना खिळवून ठेवले. महानिर्मितीच्या कलावंतांना आपली कला सादर करण्यासाठी राज्यस्तरीय नाट्यस्पर्धेचे आयोजन लक्ष्मीनगर येथील सायंटीफिक सभागृहात करण्यात आले. राज्यातील महानिर्मितीच्या एकाहून एक



दर्जेदार रंगभूमीच्या कलाकारांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला आहे. दोन जुलैपासून प्रारंभ झालेल्या या नाट्यस्पर्धेचा कोराडी वीज केंद्राच्या 'गावभाग' व उरण धायू विद्युत केंद्राच्या 'भांडा सौख्य भरे' या नाटकांच्या प्रयोगाने श्रीगणेशा केला.

प्रारंभीच पडक्या वाड्यात प्रवेश करणा-या पती व पत्नीच्या संवादाने नाटकाच्या कथेचे गांभिर्य रसिकांच्या मनात निर्माण होऊ लागते. गाडी पावसांत बंद झाली, अपघातातूनही वाचली.

अशा स्थितीत जणू आपले मरण समोर उभे ठाकले आहे, या संशयाने पछाडलेल्या पतीची बिकट अवस्था आणि प्रत्येकच गोष्टीचा संबंध मृत्यूशी जोडणा-या संशयी स्वभावाला कंटाळलेली बायको, या रंगभूमीवरून रसिकांनी अनुभवली. अशातच एका गूढ पात्राची, अर्थात वाड्याच्या मालकाची एन्ट्री होते आणि नाटकातील रोमांच वाढतच जातो. हे मालकाचे पात्र या जोडप्याला जीवनाचे सार सांगत, त्यांच्या नातेसंबंधातील दुराव्यावर भाष्य करतो. नाटक अचानक वेगळेच वळण घेते व ते तिघेही अपघातात मृत झालेले आहेत, असे सगळ्यांच्या लक्षात येते. वृध्द मालक अचानक गायब होतो व पती-पत्नीचे वाद चालूच असतात व एका वळणावर पतीला आपला भूतकाळ, जीवनपट आठवायला लागतो. अशी विविधरंगी पण प्रेक्षकांना कथेला जोडून ठेवणाऱ्या या नाट्यप्रयोगाची परळी औ. वि. केंद्राचे मुख्य अभियंता एस. जी. इंगळे यांनी निर्मिती केली. प्रदीप लेंडवे यांनी दिग्दर्शनात सहकार्य केले. प्रसाद निर्मळे, अभिषेक वाघमारे आणि सोनाली डोंगरे यांनी प्रमुख भूमिका सांभाळली. पवित्रा डोंगरे यांचे व्यवस्थापन तर यशवंत पवार यांचे नेपथ्य, दिनेश कदमांची प्रकाशयोजना आणि प्रशांत पांडे, पल्लवी शिराळे यांचे संगीत, गौरी लेंडवे यांनी वेशभूषा तर प्रदीप भुक्तर यांनी रंगमंच व्यवस्था नाटकाला वेगळ्या उंचीवर घेऊन गेली. मिलिंद चन्ने, संजय सातफळे आणि महेश होनमाने यांनी ऋणनिर्देश दिलेत.

---

**महानिर्मिती**
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित

# संपादकीय...

कुशल, अनुभवी आणि तांत्रिकदृष्ट्या सक्षम मनुष्यबळ ही महानिर्मितीची खरी ताकद आणि ओळख आहे. आजवर महानिर्मितीच्या मनुष्यबळाने वीज उत्पादनाच्या राष्ट्रीय कार्यासोबतच विविध क्षेत्रात राष्ट्रीय/राज्य पातळीवर आपल्या कला कौशल्याची चुणूक दाखवली आहे. महानिर्मिती परिवारातील मुले-मुली उच्च विद्याविभूषित असून ते देश-परदेशात आपल्या कार्याचा ठसा उमटवत आहेत. एकूणच काय तर बहुआयामी व्यक्तिमत्व घडविण्याची किमया खऱ्या अर्थाने महानिर्मितीने आपल्या वसाहतीत उपलब्ध करून दिलेल्या सोयीसुविधांमुळे शक्य झाली आहे असेच म्हणावे लागेल.

आज घडीला महानिर्मितीमध्ये नाट्य चळवळ प्रगल्भ झाली असून याची पावती परीक्षकांनी दिली आहे. दमदार अभिनयाच्या जोरावर अनेक रंगकर्मींना मराठी-हिंदी मालिका, चित्रपटात काम करण्याची संधी मिळाली आहे. कामगार कल्याण मंडळ आणि राज्य नाट्यस्पर्धेत महानिर्मितीच्या नाट्यचमूने पारितोषिके पटकावली आहेत.

नागपूर येथे नुकत्याच संपन्न झालेल्या नाट्यस्पर्धेत संहिता निवड, लेखन, दिग्दर्शन, नेपथ्य, प्रकाश व्यवस्था, संगीत आणि कसदार अभिनयाने सर्व नाटकांना प्रेक्षकांची वाहवा मिळाली. या आठही नाट्य संघांनी घेतलेली मेहनत इतरांना माहीत व्हावी, त्यांना प्रोत्साहन तथा कौतुकाची थाप मिळावी म्हणून सृजन या गृहपत्रिकेचा नाट्य विशेषांक मर्यादित प्रतींसह भौतिक (फिजिकल) तथा डिजिटल स्वरुपात देताना मनस्वी समाधान होत आहे. महिला दिन विशेषांकाप्रमाणे नाट्य विशेषांक देखील आपल्या गोड आठवणींना उजाळा देईल आणि आपला आनंद शतगुणित करेल या अपेक्षेसह...

- यशवंत मोहिते
जनसंपर्क अधिकारी

## आभाराचे दोन शब्द...



नाट्यस्पर्धा यशस्वी करण्यासाठी
महानिर्मितीचे मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक, मा. संचालक मंडळ,
मा. कार्यकारी संचालक मंडळ, सर्व मुख्य अभियंते, मुख्य महाव्यवस्थापक,
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, संघ व्यवस्थापक, कल्याण अधिकारी,
सहाय्यक कल्याण अधिकारी, सर्व आजी-माजी रंगकर्मी, सर्व संघटना प्रतिनिधी,
नाट्यस्पर्धा आयोजन समिती पदाधिकारी-सदस्य, माध्यम प्रतिनिधी,
महानिर्मिती कुटुंबिय यांचे मोलाचे योगदान लाभले
आपणां सर्वांचे मनःपूर्वक आभार...

विलास मोटघरे
मुख्य अभियंता (कोराडी औ.वि. केंद्र)

























**संपादक : यशवंत मोहिते (जनसंपर्क अधिकारी)**

**पत्रव्यवहाराचा पत्ता :** संपादक, सृजन (महानिर्मिती), प्रकाशगड, दुसरा मजला, वांद्रे (पूर्व), मुंबई – ४०००५१. **(खाजगी वितरणासाठी)**

**E-mail :** pro@mahagenco.in
**Web. :** www.mahagenco.in
**Printed & Published by :** Shri. Yashwant Mohite for
**MAHARASHTRA STATE POWER GENERATION CO. LTD.**

**Printed At : Hema Arts**
121, Sagar, Prabhat Ind. Estate, Near Dahisar Checknaka,
Western Express Highway, Dahisar (E), Mumbai - 400068.
PH. : 28968221 & Published at Hongkong Bank Bldg., M.G. Road,
Fort, Mumbai - 400 001.
**The Company accepts no responsibility for the matter published in the journal.**